ठाणे, शनिवार दि. २२ नोव्हेंबर २०२५ वर्ष : १४, अंक : २०५, पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026


# दैनिक महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

मुख्य संपादक : चंद्रकांत भोईटे




## अग्रलेख
### निवडणुकांचा मतसंग्राम

गेल्या अनेक महिन्यांपासून ज्या निवडणूक कार्यक्रमाची प्रतीक्षा राज्यातील मतदारांना लागून राहिली होती, त्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने नुकतीच नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठीच्या निवडणूक कार्यक्रमाची ....पान २ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

| कमाल | किमान |
|---|---|
| ३२° से | २२° से |

**बाजार**

| सोने | चांदी |
|---|---|
| १,२५,५१० | १,६२,००० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



मी काय म्हणते? तुम्ही इतरांसोबत गेला असता तर आज मंत्रीमंडळात असता. जग कुठे चाललेय आणि तुम्ही कुठे ?

## थोडक्यात घडामोडी



### दुबई एअर शोदरम्यान कोसळलं भारताचं तेजस विमान

दुबई एअर शोमध्ये प्रात्यक्षिक उड्डाण करत असलेले भारतीय तेजस लढाऊ विमान कोसळले. हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (HAL) निर्मित हे विमान स्थानिक वेळेनुसार दुपारी 2:10 वाजता एअर शोदरम्यान कोसळले. या भीषण दुर्घटनेत वैमानिकाला गंभीर दुखापत झाली व त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

वायुदलाने पुढे माहिती दिली की या अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी उच्चस्तरीय न्यायालयीन चौकशीची समिती गठित करण्यात येत आहे. अपघाताची सर्व शक्यता तपासून संपूर्ण तपास अहवाल लवकरच सादर करण्यात येईल.

तेजस हे भारतातच विकसित झालेले हलके लढाऊ विमान असून त्याच्या वेग, क्षमतांमुळे आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे ते आंतरराष्ट्रीय पातळीवरही प्रसिद्ध आहे. हा अपघात भारतीय संरक्षण क्षेत्रासाठी (पान 2 वर)



### राज्यातील फार्मसी महाविद्यालयांत १५ हजारांहून अधिक जागा रिक्त

मुंबई - राज्यातील फार्मसी कॉलेजांमधील बीफार्म अभ्यासक्रमांच्या १५ हजारांहून अधिक जागा तर एमफार्म अभ्यासक्रमांच्या ८१५ जागा रिक्त राहिल्या आहेत. याशिवाय, विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेले नाहीत. फार्मसी अभ्यासक्रमांची ही प्रवेश प्रक्रिया १७ नोव्हेंबर रोजी संपली. फार्मसी प्रवेशांच्या प्रक्रियेला ७ जुलै रोजी प्रारंभ झाला. राज्याच्या सीईटी सेलच्यावतीने ही प्रक्रिया राबविण्यात आली. चार कॅप फेऱ्या आणि संस्थास्तरीय प्रवेशांची मुदत १७ नोव्हेंबर रोजी संपुष्टात आली. बीफार्मच्या राज्यात एकूण ४६,५३० जागा होत्या. त्यापैकी, ३०,५९४ जागा भरल्या असून १५,९३६ रिक्त राहिल्या आहेत. एमफार्मच्या ८,६२४ जागा असून ७,८०९ जागा भरल्या आहेत तर ८१५ रिक्त आहेत. फार्मसी कॉलेजांमधील जागा रिकाम्या राहण्याकरिता उशिराने झालेली प्रवेशप्रक्रिया कारणीभूत असल्याचे मत व्यक्त (पान 2 वर)

### एका वर्षानंतर ग्रॅच्युइटी, ओव्हरटाईमचे पैस दुप्पट, 40 कोटी कामगारांना ....

# भारतात 4 नवीन लेबर कोड लागू



**नवी मुंबई - केंद्र सरकारने नवीन श्रम संहिता लागू करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे देशभरातील कामगारांना मोठा फायदा होणार आहे. देशात नवीन श्रम संहिता लागू करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. गेल्या काही दिवसांपासून देशात नवीन कामगार संहिता अर्थात लेबर कोड लागू करण्याची प्रक्रिया सुरू होती. त्यानंतर 21 नोव्हेंबर रोजी अखेर केंद्र सरकारने नवीन कामगार संहिता लागू करण्याची घोषणा केली आहे.**

केंद्र सरकारने घेतलेल्या या निर्णयाची माहिती केंद्रीय कामगार मंत्री मनसुख मांडविया यांनी सोशल मीडियावर शेअर केली आहे. आता नवीन संहितेमुळे तब्बल 40 कोटी कामगारांना सुरक्षा कवच देण्यासह सर्व कामगारांना वेळेवर आणि किमान वेतनाची हमी देण्यात आली असल्याचं मंत्री मनसुख मांडविया यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

### नवीन कामगार संहितेतील महत्त्वाचे मुद्दे

- देशात नवीन कामगार संहिता लागू
- सर्व कामगारांना वेळेवर किमान वेतनाची हमी
- तरुणांसाठी नियुक्ती पत्रांची हमी
- महिलांना समान वेतन आणि आदराची हमी
- 40 कोटी कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा हमी
- कर्मचाऱ्यांना एक वर्षानंतर ग्रॅच्युइटीची हमी
- 40 वर्षांपेक्षा जास्त वयाच्या कामगारांना वार्षिक मोफत आरोग्य तपासणीची हमी
- ओव्हरटाईमसाठी दुप्पट वेतनाची हमी
- धोकादायक क्षेत्रातील कामगारांसाठी 100 टक्के आरोग्य सुरक्षेची हमी
- आंतरराष्ट्रीय मानकांनुसार कामगारांसाठी सामाजिक न्यायाची हमी

### कोणत्या संहिता लागू करण्याचा निर्णय?

केंद्र सरकारने कालपासून लागू केलेल्या नवीन कामगार संहितांमध्ये वेतन संहिता (2019), औद्योगिक संबंध संहिता (2020), सामाजिक सुरक्षा संहिता (2020) आणि व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाच्या परिस्थिती (OS-HWC) संहिता (2020) या संहिता लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### केंद्रीय श्रममंत्री मनसूख मांडवीय यांची घोषणा

"माझ्या कामगार बंधू आणि भगिनींसाठी कालचा दिवस ऐतिहासिक आहे. काल आमच्या सरकारने चार कामगार संहिता लागू केल्या आहेत. स्वातंत्र्यानंतर कामगारांच्या हितासाठी हा सर्वात मोठा निर्णय आहे. यामुळे देशातील कामगारांना मोठ्या प्रमाणात सक्षमता मिळेल. तसेच यामुळेव्यवसाय सुलभतेला देखील चालना मिळेल. काम करणाऱ्या बंधू आणि भगिनींसाठी सामाजिक सुरक्षा, वेळेवर वेतन आणि सुरक्षित कार्यस्थळ सुनिश्चित करण्यासाठी या संहिता महत्त्वाच्या ठरतील. माता, बहिणी आणि तरुणांना त्यांचा विशेषतः फायदा होईल. या सुधारणांमुळे एक मजबूत परिसंस्था निर्माण होईल जी भविष्यात आपल्या कामगारांच्या हक्कांचे रक्षण करेल आणि भारताच्या आर्थिक विकासाला नवीन चालना देईल. यामुळे नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होतीलच, त्याशिवाय उत्पादकताही वाढेल. विकसित भारताकडे आपला प्रवासही वेगवान होईल",

-पंतप्रधान नरेंद्र मोदी

"ही सुधारणा केवळ एक बदल नाही तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कामगारांच्या कल्याणासाठी घेतलेला एक ऐतिहासिक निर्णय आहे. या नवीन कामगार सुधारणा आत्मनिर्भर भारताच्या दिशेने एक महत्त्वाचं पाऊल आहेत आणि विकसित भारत 2047 च्या ध्येयाला नवीन चालना देतील."

- मंत्री मनसुख मांडविया



काल गुरुवारी, ठाणे, गडकरी रंगायतन येथे बिल्लावर असोसिएशनचा रौप्य महोत्सवी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सोहळ्याला उपस्थित राहून बिल्लावार समाजातील समाज बांधवांना शुभेच्छा दिल्या तसेच मनमोकळा संवाद साधला. शिंदे म्हणाले की, महर्षी नारायण गुरुजींनी दिलेला 'एक धर्म, एक जात आणि एकच देव' हा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. 'शिक्षणाद्वारे स्वावलंबी बना' हा त्यांचा संदेश समाज उन्नतीची खरी दिशा दाखवणारा असल्याचे मत याप्रसंगी व्यक्त केले. (सविस्तर वृत्त पान 2 वर)

# मनसेच्या इंजिनाला सोबत घेण्यासाठी पवारांची सहमती



## एकत्र मोर्चा काढता मग निवडणुकीत वेगळे का? पवारांचा काँग्रेसला सवाल

### शरद पवारांच्या मते...

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीवर काँग्रेसच्या नेत्यांनी शरद पवारांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली होती. यावेळी महाविकास आघाडीबाबत चर्चा झाली. मतदार यादीच्या घोळाच्या संदर्भात आणि मतचोरीच्या संदर्भात एकत्रित येत सत्याचा मोर्चा काढता आणि मग निवडणूक का वेगळी लढवता?, असं शरद पवार यांचं मत आहे. महाविकास आघाडीमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला सोबत घेऊन निवडणूक लढवण्याच्या संदर्भात शरद पवार सकारात्मक असल्याची सूत्रांची माहिती आहे. त्यामुळे काही दिवसांआधी मुंबई महानगरपालिकेची निवडणूक स्वबळावर लढवण्याची घोषणा केलेली काँग्रेस आपला निर्णय मागे घेणार का?, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

**मुंबई: मुंबई महापालिका निवडणुकीत ठाकरे बंधूंची युती जवळपास निश्चित मानली जात आहे. तर मनसेशी वैचारिक मतभेद असल्यानं मुंबई काँग्रेस यांनी ठाकरे बंधू सोबत न जाता स्वबळावर मुंबईत निवडणूक लढवण्याचा निर्णय एक प्रकारे घेतल्याचा पहायला मिळत आहे. मात्र मुंबई महापालिका निवडणुकीसाठी महाविकास आघाडी मिळून निवडणुकीच्या रिंगणात एकत्रित उतरला पाहिजे आणि त्यामध्ये राज ठाकरे हे सुद्धा सोबत असावे यासाठी उद्धव ठाकरे प्रयत्न करणार असल्याची माहिती आहे.** (पान 2 वर)

### मनसेची साथ सोडा, मुंबईत आमच्यासोबत या; काँग्रेसची उद्धव ठाकरेंना ऑफर...

मुंबई : उद्धव ठाकरेंनी मनसेची साथ सोडावी आणि आमच्यासोबत यावं अशी ऑफर काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी दिल्याची माहिती आहे. महाविकास आघाडी असताना उद्धव ठाकरेंनी काँग्रेसचा विश्वासात न घेता मनसेसोबत वेगळी चूल मांडल्यानंतर काँग्रेसमध्ये काहीशी नाराजी दिसते. त्यामुळेच काँग्रेसने 'एकला चलो रे'चा नाराही दिला होता. त्यामुळे एकीकडे मनसेसोबत युतीची चर्चा करत असलेली उद्धव ठाकरेंची शिवसेना यावर काय प्रतिक्रिया देते याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. काँग्रेसने या आधीच स्वतंत्र लढण्याची घोषणा केली आहे. मात्र मनसेची साथ सोडून जर उद्धव ठाकरे सोबत आले तर काँग्रेस स्वबळाचा पुनर्विचार करेल, मात्र त्यासाठी काही अटी आणि शर्ती लागू असतील अशी सूत्रांची माहिती आहे.

# भाजपाच्या माजी नगरसेवकाने शिंदेंच्या पदाधिकाऱ्यांना चोपलं?

## ठाण्यात राजकारण तापलं

ठाणे: एकीकडे राज्यात भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण विरुद्ध उमुख्यमंत्री आणि शिवसेना शिंदे गटाचे नेते एकनाथ शिंदे असे वाद आणि नाराजीनाट्य सुरू असतानाच ठाण्यात शिवसेना शिंदे गट आणि भाजपच्या पदाधिकाऱ्यांमध्ये राडा झाला आहे. भाजपच्या माजी नगरसेवकाने शिवसेना शिंदे गटाच्या शाखाप्रमुख आणि उपविभाग प्रमुखाला मारहाण केल्याची तक्रार नौपाडा पोलीस स्थानकात करण्यात आली आहे. सदर प्रकरणानंतर पोलिसांनी एनसी देखील दाखल करुन घेतली आहे. 20 नोव्हेंबर रोजी रात्री उशिरा पोलिसांस सदर प्रकरणाबाबत तक्रार देण्यात आली.शिवसेना शिंदे गटाचे हरेश महाडीक, शाखाप्रमुख आणि महेश लहाने, उपविभागप्रमुख यांना मारहाण करण्यात आली आहे. भाजपचे माजी आणि ज्येष्ठ नगरसेवक नारायण पवार यांनी मारहाण केल्याचा आरोप शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आला आहे.

**नेमकं काय घडलं? -** परवा (20 नोव्हेंबर) बीएसयूपी घरांना शंभर रुपये रजिस्ट्रेशन फी जाहीर करण्यात आली, एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून हे करण्यात आले असल्याने शिवसैनिक बीएसयूपी इमारतीत जाऊन सेलिब्रेशन (पान 2 वर)



इथल्या रहिवाशांना जे 1 टक्का स्टॅम्प ड्युटी लागणार होती, ते 100 रूपये लागणार म्हणून आम्ही त्याचं अभिनंदन करण्यासाठी गेलो होतो. त्या 185 कुटुंबियांसाठी मी मेहनत केली. तेव्हा कुणी आलं नाही. आता स्टंटबाजी करायला आले. तिथे कुठेच जल्लोष नव्हता, मी काही कुणाला मारहाणही केली नाही. काही लोक चुकीची माहिती देऊन गुन्हे दाखल करताय, असा दावा नारायण पवार यांनी केला. तसेच आम्ही महायुतीमध्ये आहोत, युती झाली तर आम्ही युतीतून लढणार आहोत. आम्ही वादावादी करणार नाही. नरेश म्हस्के जेव्हा खासदारकीसाठी उभे होते, तेव्हा आम्ही त्यांचा प्रचार केला होता, असंही नारायण पवार यांनी सांगितले.

- नारायण पवार, माजी नगरसेवक, भाजपा



नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या सिंहासनारूढ पुतळ्याचे अनावरण काल शुक्रवारी महाराष्ट्राचे वनमंत्री गणेशजी नाईक यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. नेरुळ सेक्टर-१ चा हा चौक केवळ वाहतुकीचा केंद्रबिंदू न राहता, आज एक सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि प्रेरणादायी स्थळ म्हणून उजळला आहे. मेघडंबरीच्या मध्यभागी १२ फूट उंच, २.५ टन वजनाचा, ब्रॉन्झ धातूपासून साकारलेला शिवरायांचा सिंहासनारूढ भव्य पुतळा, भाला हातात घेतलेले मावळे, तोफेसह तयार केलेले ऐतिहासिक दृश्य, आणि 'संघहंकारी' संकल्पनेवरील विशेष फलक या संपूर्ण स्मारकाला अधिकच दिव्यता देतात आणि म्हणूनच, नेरुळ सेक्टर-१ चा हा छत्रपती शिवाजी महाराज चौक आता केवळ वाहतुकीचा केंद्रबिंदू न राहता, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वैभवाने नटलेला एक नवा आणि अभिमानास्पद ओळखबिंदू ठरेल.

### आमदार-खासदारांना सन्मानाची अन् सौजन्याची वागणूक देण्यासंदर्भात सरकारचा मोठा निर्णय

# अधिकाऱ्यांसाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी

## लोकप्रतिनिधींना मान न देणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांना निलंबनाचा ...

राज्यातील आमदार खासदारांना सन्मानाची व सौजन्याची वागणूक मिळण्यासंदर्भात सर्व मंत्रालयीन प्रशासनिक विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, जिल्हा प्रमुख, कार्यालय प्रमुख शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, संस्था, मंडळे, महामंडळे, शासन नियंत्रित व तत्सम संस्थांमधील सर्व अधिकारी कर्मचारी यांना विशेष मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. विधानमंडळ सदस्य/संसद सदस्य कार्यालयास भेट देतील, त्यावेळी त्यांना संबंधित अधिकारी, कर्मचारी यांनी आदराची व सौजन्याची वागणूक द्यावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. आमदार खासदारांचे म्हणणे काळजीपूर्वक ऐकावे आणि प्रासंगिक शासकीय नियम व प्रक्रियेनुसार शक्य तेवढी तत्काळ मदत करावी, असे शासन निर्णयात म्हटले आहे.

**...तर आमदार-खासदारांना उभे राहून अभिवादन करावे -** विधानमंडळ, संसद सदस्य भेटावयास येतेवेळी व भेट संपून परत जातेवेळी अधिकाऱ्यांनी (पान 2 वर)

### GR मधील 10 महत्त्वाच्या सूचना

- आमदार/खासदार कार्यालयात आला की अधिकारी तत्काळ उठून उभे राहणार.
- लोकप्रतिनिधींशी बोलताना नम्र आणि आदरयुक्त भाषा वापरणे बंधनकारक.
- अधिकाऱ्यांनी त्यांचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकावे, मध्ये अडथळा करू नये.
- फोनवर बोलताना तसाच सौजन्यपूर्ण संवाद ठेवावा.
- कार्यालयीन दप्तरात लोकप्रतिनिधींशी झालेल्या पत्रव्यवहाराची स्वतंत्र नोंदवही ठेवणे अनिवार्य.
- त्यांच्या अर्ज, तक्रारी, सूचना, हरकती यांना दोन महिन्यांत उत्तर देणे बंधनकारक.
- वेळेत उत्तर देणे शक्य नसल्यास पूर्वसूचना देऊन कारण स्पष्ट करणे आवश्यक.
- सरकारी प्रशिक्षण संस्थांनी 'सौजन्य वागणूक' हा स्वतंत्र धडा अभ्यासक्रमात समाविष्ट करावा.
- अधिकारी-कर्मचारी यांनी लोकप्रतिनिधींशी अवहेलना किंवा बेअदबी केल्यास कारवाई.
- प्रलंबित मुद्द्यांवर फॉलो-अप बैठकांची नोंद ठेवणे आवश्यक.

### आमदारांनी कसे वागावे, कसे वागू नये हे नितीमूल्य समिती ठरणार!

विधिमंडळाच्या विविध समित्यांच्या सदस्यांचे आचरण कसे असावे, यासाठी नितीमूल्य समिती स्थापन करण्यात आली आहे. आमदार चैनसुख संचेती हे या समितीचे अध्यक्ष असून समितीने अहवाल दिल्यानंतर वर्तनाचे नियम निश्चित होणार असल्याची माहिती आहे. समितीत चैनसुख संचेतींसोबतच सुधीर मुनगंटीवार, विजय देशमुख, दीपक केसरकर, दिलीप वळसे पाटील, सुनिल प्रभू, अमिन पटेल, अमरिश पटेल, आणि रामराजे निंबाळकर समितीत असणार आहे. धुळ्यात विधिमंडळाची अंदाज समिती दौऱ्यावर असताना अध्यक्ष खोतकर यांच्या कथित पीएच्या निवासस्थानातील खोलीत 1 कोटी 80 लाख रुपये सापडले होते . ह्या घटनेनंतर खळबळ उडाली होती, सोबतच मुख्यमंत्र्यांनी सखोल चौकशीचे आदेश देखील दिले होते.

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## निवडणुकांचा मतसंग्राम

गेल्या अनेक महिन्यांपासून ज्या निवडणूक कार्यक्रमाची प्रतिक्षा राज्यातील मतदारांना लागून राहिली होती, त्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने नुकतीच नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठीच्या निवडणूक कार्यक्रमाची घोषणा केली आहे. निवडणूक कार्यक्रमानुसार, पहिल्या टप्प्यात राज्यभरात नगरपरिषद व नगरपंचायतीसाठी निवडणूक होणार आहे तर दुसऱ्या टप्प्यात जिल्हापरिषद व महानगर पालिकांसाठीच्या कार्यक्रमाची घोषणा केली जाणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, २ डिसेंबर रोजी महाराष्ट्रभरात नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी मतदान होणार असून ३ डिसेंबर रोजी मतमोजणी केली जाईल. ३ डिसेंबर रोजी या निवडणुकांचे निकाल जाहीर केले जातील. कोणत्या नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी निवडणुका होणार याची सविस्तर जिल्हानिहाय यादीदेखील निवडणूक आयोगाकडून देण्यात आली आहे. आता बिहार विधानसभा निवडणूक संपल्यानंतर महाराष्ट्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष केंद्रीत झाले आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी १० नोव्हेंबर पासून अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत १७ नोव्हेंबर रोजी संपली आहे. अर्जांची छाननी आज १८ नोव्हेंबर होईल. अर्ज माघारी घेण्याची अंतिम मुदत २१ नोव्हेंबरपर्यन्त असणार आहे. आक्षेप असलेल्या ठिकाणी अर्ज माघारी घेण्याची अंतिम मुदत २५ नोव्हेंबर रोजी असणार आहे. उमेदवारांचे निवडणूक चिन्ह व उमेदवारांची अंतिम यादी २६ नोव्हेंबर रोजी मिळणार आहे. म्हणजे उमेदवारांना त्यांना मिळालेल्या चिन्हांचा प्रचार करण्यास सहा दिवस मिळणार आहे. एवढ्या कमी कालावधीत उमेदवार मतदारांपर्यंत पोहोचणार कसे हा प्रश्नच आहे. कारण नगरपालिकांसाठी मतदानाची तारीख २ डिसेंबर २०२५ आहे. मतमोजणी ३ डिसेंबर होणार असून त्याचदिवशी निकाल जाहीर केला जाणार आहे.

राज्य निवडणूक कार्यक्रमांतर्गत राज्यातील २४६ नगर परिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका घेतल्या जाणार आहेत. यामधून ६,८४९ सदस्यांची व २८८ अध्यक्षांची निवड होणार आहे. यंदा १० नव्या नगर परिषदांच्या निवडणुका होणार आहेत. तर, २३६ नगर परिषदांची मुदत संपली आहे. तसेच राज्यातील ४७ पैकी पाच नगर पंचायतींची मुदत अद्याप संपलेली नाही. तर उर्वरित ४२ नगरपंचायतींची निवडणूक होणार आहे. यापैकी २७ नगर पंचायतींची मुदत संपली असून १५ नव्या नगरपंचायतींची यंदा भर पडली आहे. नगरपंचायत व नगरपरिषद निवडणूक एकूण जागा आणि आरक्षित जागा निवडणूक होत असलेल्या २४६ नगरपरिषदा, ४२ नगरपंचायतींच्या निवडणुका होणार आहेत. एकूण प्रभाग ३८२० आहेत. एकूण जागा ६८५९ आहेत. यामध्ये ३४९२ महिलांसाठी जागा असून ८९५ जागा अनुसूचित जातींसाठी तर ३३८ जागा अनुसूचित जमातींसाठी राखीव आहेत. १८२१ जागा नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी राखीव आहेत.

मतदारांच्या मदतीसाठी निवडणूक आयोगाचे मोबाईल ॲप विकसित केले आहे, मतदारांसाठी राज्य निवडणूक आयोगाने संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यातील सर्च सुविधेमार्फत मतदारांना त्यांचे नाव व मतदान केंद्र शोधता येईल असे निवडणूक आयुक्तांनी सांगितले आहे. मोबाईल ॲपद्वारे मतदार यादीतील नाव, मतदान केंद्र, उमेदवाराविषयी माहिती, उमेदवारांचे प्रतिज्ञापत्र, गुन्हेगारी पार्श्वभूमीबाबत माहिती, शिक्षणाविषयी, आर्थिक स्थितीविषयी मतदारांना माहिती मिळू शकेल. यंदाच्या नगरपंचायत व नगरपरिषद निवडणूकीत उमेदवारांसाठी खर्चाची मर्यादा वाढवली आहे. या निवडणुकीत अ वर्ग नगरपरिषदांच्या अध्यक्षपदासाठी १५ लाख व सदस्यपदासाठी ५ लाखांची खर्चमर्यादा ठेवण्यात आली आहे. ब वर्ग नगरपरिषदेसाठी हीच मर्यादा अनुक्रमे ११ लाख २५ हजार आणि ३ लाख ५० हजार ठरवण्यात आली आहे. क वर्गासाठी हीच मर्यादा अनुक्रमे ७ लाख ५० हजार व २ लाख ५० हजार ठरवण्यात आली आहे. याशिवाय, नगरपंचायतीच्या अध्यक्षपदासाठी ६ लाख तर सदस्यपदासाठी २ लाख २५ हजार खर्चाची मर्यादा ठरवण्यात आली आहे.

नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी एकूण १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६ मतदार मतदान करणार आहेत. त्यासाठी सुमारे १३ हजार ३५५ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. या निवडणुकांसाठी पुरेशा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात १३ हजार ७२६ कंट्रोल युनिट आणि २७ हजार ४५२ बॅलेट युनिटची व्यवस्था करण्यात आली आहे. विरोधकांनी मागणी करूनही निवडणूक आयोगाने बॅलेट पेपरवर मतदान टाळले आहे.

ठाणे जिल्ह्यात अंबरनाथ आणि कुळगाव- बदलापूर येथील नगरपरिषद व नगरपंचायतीसाठी निवडणूक होणार आहे. पालघर जिल्ह्यात डहाणू, जव्हार, पालघर आणि वाडा (न.पं) येथील नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी निवडणूक होणार आहे. रायगड जिल्ह्यात अलिबाग, कर्जत, खोपोली, महाड, माथेरान, मुरुड-जंजिरा, पेण, रोहा, श्रीवर्धन आणि उरण (न.प.) येथे निवडणुका होणार आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात चिपळूण, देवरुख (न.पं.), गुहागर, खेड, लांजा (न.पं.), राजापूर आणि रत्नागिरी येथे निवडणुका होणार आहेत. कोल्हापूर जिल्ह्यात आजरा (न.पं.), चंदगड (न.पं.), गडहिंग्लज, हातकणंगले, हुपरी, जयसिंगपूर, कागल, कुरुंदवाड, मलकापूर, मुरगूड, पन्हाळा, शिरोळ आणि वडगाव येथील नगारपरिषदा व नगरपंचायतींसाठी निवडणुका होणार आहेत. पुणे जिल्ह्यात आळंदी, बारामती, भोर, चाकण, दौंड, फुरसुंगी- उरळी देवाची, इंदापूर, जेजूरी, जुन्नर, लोणावळा, मालेगाव बु. (न.पं.), मंचर (न.पं.), राजगुरुनगर, सासवड, शिरुर, तळेगाव- दाभाडे आणि वडगाव (न.पं.) येथे निवडणुका होणार आहेत. सांगली जिल्ह्यात आष्टा, आटपाडी (न.पं.), इस्लामपूर, जत, पळूस, शिराळा (न.पं.), तासगाव आणि विटा. तर सातारा जिल्ह्यात कराड, महाबळेश्वर, मलकापूर, मेढा (न.पं.), म्हसवड, पाचगणी, फलटण, रहिमतपूर, सातारा आणि वाई तसेच सोलापूर जिल्ह्यात अक्कलकोट, अकलूज, अनागर (न.पं.), बार्शी, दुधनी, करमाळा, कुर्डूवाडी, मैदर्गी, मंगळवेढा, मोहोळ, पंढरपूर आणि सांगोला येथील नगरपंचायत व नगरपरिषदांसाठी निवडणुका होणार आहेत. ठाणे- २, पालघर- ४, पुणे विभाग एकूण- ६०, कोल्हापूर- १३, पुणे- १७, सांगली- ८, सातारा- १०, सोलापूर- १२ अशी नगरपरिषद-नगरपंचायतींची जिल्हा व विभागनिहाय संख्या आहे. यंदाची राज्यातील नगरपालिका, नगरपंचाय आणि नगरपरिषदांची निवडणूक ही डिजिटल पद्धतीने होणार असून मतदान यादीतील घोळ संपल्यावरच निवडणुका घ्याव्यात, अशी विरोधकांची मागणी असून निवडणुका ठरलेल्या वेळेत होणार आहेत.

# सिडकोतर्फे प्रथमच ‘प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य’तत्त्वावर 4508 घरांची गृहनिर्माण योजना जाहीर

## अर्जदारांना स्वत:च्या पसंतीची सदनिका निवडण्याची सुवर्णसंधी

नवी मुंबई - सिडकोच्या इतिहासात प्रथमच "प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य" तत्त्वावर 4,508 घरांची गृहनिर्माण योजना जाहीर करण्यात आली असून 22 नोव्हेंबर 2025 रोजी दुपारी 04.00 वाजेपासून योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीस सुरुवात होणार आहे. या योजनेंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गट यांकरिता नवी मुंबईतील तळोजा, द्रोणागिरी, घणसोली, खारघर आणि कळंबोली येथील सिडकोच्या गृहसंकुलांतील 4,508 सदनिका विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अर्जदारांना प्रथमच स्वत:च्या पसंतीची सदनिका निवडण्याचे स्वातंत्र्य हे या योजनेचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

सिडकोतर्फे सातत्याने विविध आर्थिक उत्पन्न गटांतील नागरिकांकरिता गृहनिर्माण योजनांद्वारे परवडणाऱ्या दरातील घरे उपलब्ध करून देण्यात येतात. या योजनेंतर्गत तळोजा, द्रोणागिरी, घणसोली, खारघर आणि कळंबोली येथील सिडकोच्या गृहसंकुलांतील उर्वरित 4,508 सदनिका उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. एकूण 4,508 सदनिकांपैकी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता 1,115 तर अल्प उत्पन्न गटाकरिता 3,393 सदनिका उपलब्ध आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या सदनिकांकरिता प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत रु. 2.50 लाख अनुदान उपलब्ध आहे.

सदर योजनेतील सदनिका या तयार (रेडी टू मूव्ह) असून अर्जदारांना त्यांच्या पसंतीची सदनिका निवडण्याचे स्वातंत्र्य आहे. ‘प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य’ या तत्त्वावर सदनिकांची विक्री करण्यात येणार आहे. सदनिकेच्या किंमतीच्या संपूर्ण रकमेचा भरणा केल्यानंतर अर्जदारांना लगेच सदनिकेचा ताबा देण्यात येणार आहे. कागदपत्रांची तपासणी पूर्ण झाल्यानंतर पात्र अर्जदारांना त्यांच्या पसंतीची सदनिका निवडण्याची संधी मिळणार आहे.

या योजनेतील सर्व गृहसंकुले ही नवी मुंबईतील विकसित नोडमध्ये आहेत. या परिसरामध्ये सर्व मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापासून नजीकच्या अंतरावर असलेल्या या गृहसंकुलांना उपनगरीय रेल्वे, मेट्रो आणि महामार्ग यांद्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे.

ऑनलाइन अर्ज नोंदणीकरिता cidcofcfs.cidcoindia.com हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. योजनेचा सविस्तर तपशील जसे, सदनिकेचे क्षेत्रफळ, किंमत इ. देखील सदर संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. ऑनलाइन अर्ज नोंदणी दि. 22 नोव्हेंबर 2025 रोजी दुपारी 04.00 वाजेपासून सुरू होणार आहे. दि. 21 डिसेंबर 2025 पर्यंत नोंदणी केलेल्या पात्र अर्जदारांना दि. 28 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 11.00 वाजेपासून त्यांच्या पसंतीच्या सदनिकेची निवड करता येणार आहे. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर सदनिकांची विक्री केली जाणार असल्याने अर्जदारांनी उपरोक्त कालावधीमध्ये, लवकरात लवकर अर्ज करून आपल्या घराचे स्वप्न पूर्ण करावे, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे.



“सिडकोच्या सोयी सुविधांनी सुसज्ज गृहसंकुलांतील 4,508 सदनिका या योजनेद्वारे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या योजनेकरिता सोडत किंवा लॉटरी नसून आपल्या पसंतीची सदनिका निवडण्याचे स्वातंत्र्य अर्जदारांना आहे. यामुळे त्यांना शब्दश: आपल्या स्वप्नातील घर साकारता येणार आहे. पुन्हा एकदा सर्वसामान्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या व देशातील सर्वाधिक वेगाने विकसित होणाऱ्या शहरांपैकी एक असलेल्या नवी मुंबईमध्ये आपले घर घेण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. याकरिता अधिकाधिक नागरिकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन मी करतो.”

- **विजय सिंघल,** उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको

# बिल्लावर समाजाचा २५ वा रौप्य महोत्सवी समारंभ ठाण्यात संपन्न

## “कर्नाटकाची मुळे, महाराष्ट्राचे हृदय – बिल्लावर समाजावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा स्तुती वर्षाव!”

ठाणे - समाज एक संघ राहिल्यास समाजाची प्रगती आणि उन्नती होते. ज्या ठिकाणी तुम्ही जाता, त्या ठिकाणच्या माती, संस्कृती आणि परंपरेशी तुम्ही एकरूप होत समाजाला पुढे नेत आहात. तशीच आमची शिवसेना आहे, जी सर्व समाजांना सोबत घेऊन प्रामाणिकपणे पुढे नेण्याचे काम करत आहे, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

बिल्लावर असोसिएशन मुंबईतर्फे आयोजित २५ वा रौप्य महोत्सवी समारंभ ठाण्यातील गडकरी रंगायतन येथे पार पडला. त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते.

यावेळी बोलताना शिंदे म्हणाले, “ब्रह्मर्षी नारायण गुरुजींनी दिलेला ‘एक धर्म, एक जात आणि एकच देव’ हा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. ‘शिक्षणाद्वारे स्वावलंबी बना’ हा त्यांचा संदेश समाज उन्नतीची खरी दिशा दाखवणारा आहे.”

मुंबई, ठाणे आणि राज्यभरात बिल्लावर समाजाच्या २२ स्थानिक शाखा कार्यरत असून ३८ हजार सभासद उत्सव, परंपरा आणि संस्कृती जपत एकोप्याने राहतात, हे कौतुकास्पद असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

कोविड काळातील समाजाने केलेल्या सामाजिक कार्याची आठवण करून देत त्यांनी म्हटले, “त्या काळात मोठ्या संख्येने तुमच्या समाजाने मदतकार्य करत गरजूंपर्यंत अन्न पोहोचवले. संकटाच्या वेळी समाज एकत्र येऊन सेवा करतो, हे तुमच्या संस्कारांचे उदाहरण आहे.”

कार्यक्रमात सादर झालेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या नाट्यप्रयोगाचेही शिंदे यांनी कौतुक केले. कलाकारांनी तीन महिने मेहनत घेऊन ऐतिहासिक भूमिकांना न्याय दिल्याचे त्यांनी गौरविले.

शिवसेनेच्या भूमिका सांगताना शिंदे म्हणाले, “आमच्या पक्षात कोणी मालक किंवा नोकर नाही, सगळे कार्यकर्ते आहोत. मुख्यमंत्री असतानाही आणि आता उपमुख्यमंत्री असूनही मी कार्यकर्ता म्हणूनच काम करतो आणि पुढेही तसाच राहीन.”

शिक्षण क्षेत्रात समाज करत असलेल्या कार्याचे कौतुक करत त्यांनी तरुण पिढीसाठी संदेश दिला.

“उच्च शिक्षण, मेहनत आणि प्रामाणिकपणामुळे तुमच्या समाजातील मुले उद्या अधिकारी, अभियंते, डॉक्टर, वकील आणि मोठ्या पदांवर पोहोचतील, यात शंका नाही,” असे त्यांनी नमूद केले.

## मनसेच्या इंजिनाला सोबत घेण्यासाठी पवारांची सहमती

**(पान 1 वरून )** महायुतीविरोधात मुंबई महापालिका निवडणूक) जिंकायची असेल तर विरोधकांची वज्रमूठ आणखी घट्ट करून ताकद वाढवण्याच्या दृष्टिकोनातून उद्धव ठाकरे हे प्रयत्नशील असल्याची माहिती समोर येत आहे. तर मुंबई महानगरपालिकेची निवडणूक महाविकास आघाडीने (Mahavikas Aghadi) एकत्र लढवली पाहिजे, असं मत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रमुख शरद पवार (Sharad Pawar) यांचं असल्याचं सांगण्यात येत आहे.

**वर्षा गायकवाड मनसेला सोबत घेण्याबाबत काय म्हणाल्या होत्या? -** मागच्या काही काळात दोन महिन्यांपूर्वी आम्ही महाविकास आघाडी म्हणून नाही तर स्वबळावर निवडणुका लढवणार आहोत, असे शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी सांगितलं होतं. ही निवडणूक स्थानिक पातळीवरची असल्याने आम्ही एकट्याने लढू शकतो, अशी भूमिका त्यांनी मांडली होती. बाकी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे दोन्ही भाऊ एकत्र आले तर आम्ही शुभेच्छाच देतो. पण हा निर्णय घेताना आमच्याशी चर्चा व्हायला हवी होती. काँग्रेस पक्ष हा आघाडी करताना एक किमान समान कार्यक्रम समोर ठेवून आघाडी करतो. इंडिया आघाडी असो किंवा महाविकास आघाडी असो, आमच्यासाठी संविधान हा समान धागा राहिलेला आहे, असं वर्षा गायकवाड म्हणाल्या.

## भाजपाच्या माजी नगरसेवकाने शिंदेंच्या पदाधिकाऱ्यांना चोपलं

**(पान 1 वरून )** करत होते. पाच पाखाडी विभागातील लक्ष्मी नारायण बिल्डिंगमध्ये असेच सेलिब्रेशन करण्यात येणार होते. मात्र त्याठिकाणी भाजपच्या माजी नगरसेवकाने येऊन शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांन कसे सेलिब्रेशन करता? असे विचारात भाजपचे माजी आणि ज्येष्ठ नगरसेवक नारायण पवार यांनी मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. यासंदर्भात नारायण पवार यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. मात्र शिवसेना शिंदे गट विरुद्ध भाजप हा व ठाण्यातील वाद आणखी चिघळणार, अशी चिन्हे दिसू लागली आहेत.

## अधिकाऱ्यांसाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी

**(पान 1 वरून )** त्यांना उभे राहून अभिवादन करावे. त्यासोबतच आमदार, खासदारांना मोबाईलवर संवाद साधताना नेहमी आदरयुक्त भाषा व शिष्टाचार पाळावा, असे ही या शासन निर्णयात म्हटले आहे. क्षेत्रीय विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुख यांनी अभ्यागतांच्या, नागरिकांच्या भेटीकरीता राखीव वेळेव्यतिरिक्त, त्यांच्या क्षेत्रातील विधानमंडळ सदस्य, संसद सदस्य यांची भेट आणि कामांचा आढावा याकरीता दर महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या गुरुवारी दोन तासाची राखीव वेळ सुनिश्चित करून ती पूर्व प्रसिद्ध करावी, असेही त्यात म्हटले आहे.

**कार्यक्रम पत्रिकेत नावे अचूक व योग्यरित्या राजशिष्टाचारानुसार छापावीत -** ज्या जिल्ह्यात स्थानिक, राज्यस्तरीय, शासकीय भूमिपूजन, उद्घाटन, इत्यादीं कार्यक्रम असेल त्या जिल्हयातील सर्व केंद्रीय व राज्यातील मंत्री, राज्यमंत्री, त्या जिल्हयाचे पालकमंत्री, स्थानिक सर्वपक्षीय विधानमंडळ सदस्य, संसद सदस्य, महापौर जिल्हा परिषद अध्यक्ष नगराध्यक्ष, सरपंच अशा लोकप्रतिनिधींना आमंत्रित करण्यात यावे. तसेच, निवासी उपजिल्हाधिकारी यांचेकडून खात्री करुनच कार्यक्रम पत्रिकेत त्यांची नावे अचूक व योग्यरित्या राजशिष्टाचारानुसार छापावीत असेही त्यात म्हटले आहे.

## राज्यातील फार्मसी महाविद्यालयांत १५ हजारांहून अधिक जागा रिक्त

**(पान 1 वरून )** करण्यात येते आहे. इंजिनीअरिंगची प्रवेशप्रक्रिया संपल्यानंतर फार्मसीचे प्रवेश केले जातात. अनेक विद्यार्थ्यांना फार्मसीला प्रवेश घेण्याची इच्छा असते. मात्र, इंजिनीअरिंगला आधी प्रवेश मिळाल्याने तिथे विद्यार्थी आपले प्रवेश निश्चित करतात.

## दुबई एअर शोदरम्यान कोसळलं भारताचं तेजस विमान

**(पान 1 वरून )** मोठा धक्का मानला जात आहे. प्रात्यक्षिकादरम्यान हे विमान हवेत जटिल कलाकौशल्ये सादर करत असताना अचानक नियंत्रण सुटल्यासारखे दिसले आणि काही क्षणांतच विमान जमिनीवर आदळले. अपघातानंतर परिसरात घनदाट काळा धूर पसरला व तो दूरवरूनही दिसत होता. या दुर्घटनेने प्रेक्षकांमध्ये प्रचंड घबराट निर्माण झाली. विशेषतः एअर शो पाहण्यासाठी आलेल्या कुटुंबांनी आणि लहान मुलांसह उपस्थित असलेल्यांनी सुरक्षित स्थळी धाव घेतली.

## मुंबई मनपाबाबत भाजपाचा अंतर्गत सर्व्हे, 100 जागा मिळण्याचा अंदाज; पण स्वबळासाठी कसरत करावी लागणार!

मुंबई: मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी भाजपनं अंतर्गत सर्व्हे केल्याची माहिती समोर आली आहे. याअंतर्गत सर्व्हेमध्ये भाजपाला 100 हून अधिक जागा मिळणार असल्याचा अंदाज आहे. सध्या महापालिकेत भाजपचे 82 नगरसेवक आहेत. असं असताना भाजपचा विरोधी पक्षाच्या नेत्यांच्या बालेकिल्ल्यावरही डोळा आहे. विरोधकांच्या वॉर्डात भाजप नवी रणतीनी आखण्याच्या तयारीत असल्याचं बोललं जातंय. उद्धव ठाकरेंची (Uddhav Thackeray) शिवसेना आणि काँग्रेसच्या वॉर्डमध्ये भाजपनं चाचपणी सुरु केल्याची माहिती आहे. त्यामुळे आगामी महापालिकेत भाजपची रणनीती काय आणि त्यांना किती जागा मिळणार हे पाहाणं महत्त्वाचं असणार आहे. मुंबई महापालिकेसाठी भाजपचा अंतर्गत सर्व्हेमध्ये काय? मुंबई महानगरपालिकेत एकूण 227 जागा असून स्वबळासाठी 114 जागांची आवश्यकता असते.भाजपानं केलेल्या अंतर्गत सर्व्हेक्षणात 100 पेक्षा जास्त जागा मिळताना दिसत आहेत. मात्र, स्वबळावर भाजपाला सत्ता राखण्यास अपयश मिळणार असल्याचं सर्व्हेद्वारे समोर येत आहे.


Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt., Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/02388/18/25
Inquiry/case No. : ACC/III/707/2025
Name of the Trust : KIRAN CHARITABLE TRUST
**Address of the Trust :** FLAT NO. 507, HILL QUEEN TOWER, ULHASNAGAR, THANE, THANE, UHLASNAGAR, UHLASNAGAR
**Name of the Applicant :** NARESH ARJUNLAL AHUJA

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 19/11/2025.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane



**पनवेल महानगरपालिका**
**शहर अभियंता विभाग**
**निविदा सुचना**

निविदा सुचना क्र. पमपा/बांधकाम/६६२५/प्र.क्र.०२/४४३९/२०२५ दिनांक: २१/११/२०२५

**शुध्दीपत्रक – १**

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/२५७/२०२५-२६ | उरण-पनवेल मार्गाजवळ पनवेल महानगरपालिका हद्दीतील अंतिम भुखंड क्र. ५०६, पनवेल बाजुने ते करंजाडे मल:निस्सारण उदंचन केंद्राजवळ गाढी नदीवर नविन पूल बांधणे | ४१,७२,८०,९१७/- |

या कामाच्या ई-निविदेच्या शुध्दीपत्रकाबाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि.२१/११/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
अतिरिक्त आयुक्त – I
पनवेल महानगरपालिका



**नवी मुंबई महानगरपालिका**

**शहर अभियंता विभाग**

**निविदा सूचना क्र. नमुंमपा/श.अ./ 314 /2025-26**

**कामाचे नाव:- नेरुळ विभागातील से.02 येथील भुखंड क्र.30 येथे अग्निशमन केंद्र बांधणे .**

**अंदाजपत्रकिय रक्कम (रु.) :- 13,24,23,237/-**

**निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.22/11/2025 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. ई-निविदा (E-tendering) प्रक्रियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणींसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबर वर संर्पक करावे.**

**कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकरण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.**

सही/-
**(शिरीष गं. आरदवाड)**
**शहर अभियंता**
**नवी मुंबई महानगरपालिका**

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/806/2025



**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
सार्वजनिक बांधकाम विभाग
पहिली मुदतवाढ

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत /धोकादायक इमारतींचे निष्कासन हे इच्छुक ठेकेदार/ कंपन्यांकडून करुन घेण्यासाठी EOI (Expression of Interest) स्वारस्य अभिव्यक्ती मागविणे या कामाची ऑनलाईन निविदा ठामपा/ पिआरओ/ सा.बां.मु./८३८/ २०२५-२६ दि.११.११.२०२५अन्वये मागविण्यात आली होती. सदरच्या निविदेस तांत्रिक कारणांत्सव दहा दिवसाची मुदत वाढ देण्यात येत आहे. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकिय /निमशासकिय /सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम /स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्त भंगाचे कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदणी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली /सुरु आहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सुचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे https://mahatenders.gov.in संकेत स्थळावर एका कामासाठी दि. २१.११.२०२५ ते दि. ०१.१२.२०२५ पर्यंत मुदत वाढ देवून उपलब्ध आहेत. ऑनलाईन निविदा महानगरपालिकेचे संकेतस्थळावर दि.०१.१२.२०२५ रोजी सायं १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा दि.०३.१२.२०२५ रोजी सायं. १६.०० वा. निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-मु/९०९/२०२५-२६ सही/-
दि:२१.११.२०२५ नगरअभियंता
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**Pls visit our oficial web-site www.thanecity.gov.in**

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**

## भारतीय रेल्वे

■ पदाचे नाव :
ज्युनियर इंजिनिअर
डेपो मटेरियल सुपरिटेंडंट
केमिकल & मेटलर्जिकल असिस्टंट

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.1: इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics/ Civil/ Mechanical / Production / Automobile / Instrumentation and Control / Manufacturing / Mechatronics / Industrial / Machining / Tools and Machining / Tools and Die Making / Automobile / Information Technology / Communication Engineering / Computer Science and Engineering / Computer Science / Computer Engineering)
पद क्र.2: कोणत्याही विषयातील इंजिनिअरिंग डिप्लोमा.
पद क्र.3: 45% गुणांसह B.Sc (Physics/Chemistry)

■ वयाची अट: 01 जानेवारी 2026 रोजी 18 ते 33 वर्षे [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: ₹500/- [SC/ST/ExSM/ट्रान्सजेंडर/EBC/महिला: ₹250/-]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 30 नोव्हेंबर 2025 (11:59 PM)
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल
■ वेबसाइट https://www.rrbapply.gov.in/#/auth/landing

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात

■ पदाचे नाव & तपशील:
1 प्राध्यापक 32
2 सहयोगी प्राध्यापक 32
3 सहाय्यक प्राध्यापक 47

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.1: Ph.D + 10 रिसर्च पब्लिकेशन्स + 10 वर्षे अनुभव किंवा Ph.D +10 वर्षे अनुभव
पद क्र.2: (i) Ph.D (ii) 55% गुणांसह संबंधित पदव्युत्तर पदवी (iii) 07 रिसर्च पब्लिकेशन्स (iv) 08 वर्षे अनुभव
पद क्र.3: 55% गुणांसह संबंधित पदव्युत्तर पदवी+ NET/SET किंवा Ph.D

■ वयाची अट: नमूद नाही
■ नोकरी ठिकाण: पुणे
■ Fee: खुला प्रवर्ग: ₹1000/- [मागासवर्गीय: ₹500/-]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
■ अर्ज पोस्टाने पाठविण्याचा पत्ता: The Assistant Registrar, Administration-Teaching, Savitribai Phule Pune University, Pune – 411007
■ महत्त्वाच्या तारखा:
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 07 डिसेंबर 2025
■ अर्जाची प्रिंट पोस्टाने पाठविण्याची शेवटची तारीख: 12 डिसेंबर 2025
■ अधिकृत संकेतस्थळ https://www.unipune.ac.in/

## अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेत 1300+जागांसाठी भरती

■ जाहिरात क्र.: 355/2025
■ Total: 1300+ जागा
■ परीक्षेचे नाव: सामायिक भरती परीक्षा 2025 (CRE 4-2025)
■ पदाचे नाव & तपशील:
■ पद क्र. पदाचे नाव पद संख्या
1 ग्रुप B & C (असिस्टंट डायटिशियन, सिस्टंट एडमिन ऑफिसर, डेटा एन्ट्री ऑपरेटर, ज्युनियर एडमिन असिस्टंट, निम्न श्रेणी लिपिक, असिस्टंट इंजिनिअर आणि इतर पदे) 1300
Total 1300+
■ शैक्षणिक पात्रता: 10वी/12वी उत्तीर्ण/ITI/पदवीधर/पदव्युत्तर पदवी/B.Sc/M.Sc/MSW/इंजिनिअरिंग पदवी
■ वयाची अट: 02 डिसेंबर 2025 रोजी 25/27/30/35/40/45 वर्षांपर्यंत [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC:03 वर्षे सूट]
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: ₹3000/- [SC/ST/EWS: ₹2400/-, PWD: फी नाही]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
■ सूचना: सविस्तर माहितीकरिता कृपया जाहिरात पाहा.
■ महत्त्वाच्या तारखा:
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 02 डिसेंबर 2025 (05:00 PM)
■ परीक्षा (CBT): 22 ते 24 डिसेंबर 2025
■ अधिकृत संकेतस्थळ https://www.aiims.edu/index.php?lang=en

## भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण

■ पदाचे नाव & तपशील:
1 डेप्युटी मॅनेजर (Finance & Accounts)
2 लायब्ररी अँण्ड इन्फॉर्मेशन असिस्टंट
3 ज्युनियर ट्रांसलेशन ऑफिसर
4 अकाउंटंट
5 स्टेनोग्राफर

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.1: MBA (Finance)
पद क्र.2: लायब्ररी सायन्स पदवी
पद क्र.3: (i) इंग्रजी सह हिंदी पदव्युत्तर पदवी (ii) ट्रांसलेशन डिप्लोमा किंवा 02 वर्षे अनुभव
पद क्र.4: (i) पदवीधर (ii) CA/CMA
पद क्र.5: (i) पदवीधर (ii) लघुलेखन (इंग्रजी किंवा हिंदी) मध्ये प्रति मिनिट 80 शब्दांच्या वेगाने 05 मिनिटे श्रुतलेखन आणि ट्रान्सक्रिप्शन वेळ (फक्त संगणकावर) इंग्रजीसाठी 50 मिनिटे आणि हिंदीसाठी 65 मिनिटे असेल.

■ वयाची अट: 15 डिसेंबर 2025 रोजी. [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
पद क्र. 1 ते 4: 18 ते 30 वर्षे
पद क्र.5: 18 ते 28 वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: ₹500/- [SC/ST/PWD: No fee]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 15 डिसेंबर 2025 (06:00 PM)
■ अधिकृत संकेतस्थळ https://nhai.gov.in/#/

## न्यूक्लियर पावर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.

■ पदाचे नाव & तपशील:
पद क्र. पदाचे नाव पद संख्या
1 डेप्युटी मॅनेजर (HR) 31
2 डेप्युटी मॅनेजर (F&A) 48
3 डेप्युटी मॅनेजर (C&MM) 34
4 डेप्युटी मॅनेजर (Legal) 01
5 ज्युनियर हिंदी ट्रांसलेटर (JHT) 08

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.1: (i) 60% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी (ii) MBA किंवा पदव्युत्तर पदवी किंवा डिप्लोमा किंवा व्यवस्थापन अभ्यासात पदव्युत्तर पदवी किंवा MSW
पद क्र.2: (i) 60% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी (ii) MBA किंवा पदव्युत्तर पदवी किंवा डिप्लोमा किंवा व्यवस्थापन अभ्यासात पदव्युत्तर पदवी किंवा CA, CMA, CFA
पद क्र.3: (i) इंजिनिअरिंग पदवी (ii) MBA किंवा पदव्युत्तर पदवी किंवा डिप्लोमा किंवा व्यवस्थापन अभ्यासात पदव्युत्तर पदवी
पद क्र.4: (i) 60% गुणांसह LLB (ii) 03 वर्षे अनुभव
पद क्र.5: (i) इंग्रजीसह हिंदी पदव्युत्तर पदवी (ii) ट्रांसलेशन डिप्लोमा किंवा 02 वर्षे अनुभव

■ वयाची अट: 27 नोव्हेंबर 2025 रोजी, [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
पद क्र.1 ते 4: 18 ते 30 वर्षे
पद क्र.5: 21 ते 30 वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: [SC/ST/ExSM/PWD/महिला: फी नाही]
पद क्र.1 ते 4: General/OBC/EWS: ₹500/-
पद क्र.5: General/OBC/EWS: ₹150/-
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 27 नोव्हेंबर 2025 (05:00 PM)
■ अधिकृत संकेतस्थळ https://www.npcil.

## सीएसएमटी येथे रेल्वे कर्मचाऱ्यांविरोधात प्रवाशाची तक्रार

मुंबई : सीएसएमटी येथे रेल्वे कर्मचाऱ्यांनी केलेल्या आंदोलनामुळे लाखो प्रवाशांचे अतोनात हाल झाले. या आंदोलनात सहभागी झालेले सर्व कर्मचारी, संघटनेच्या पदाधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करावा, शिस्तभंगाची कारवाई करून त्यांना निलंबित करावे, अशी तक्रार प्रवासाने केली होती. या तक्रारीची दखल घेत, मध्य रेल्वेने संपूर्ण घटनाक्रम आणि गुन्ह्याची माहिती प्रवाशाला दिली. मुंब्रा दुर्घटनेबाबत ठाणे रेल्वे पोलिसांनी मध्य रेल्वेच्या अभियंत्याविरोधात चुकीच्या पद्धतीने गुन्हा नोंदवला. त्यांच्यावरील हे गुन्हे मागे घेण्यात यावे, यासाठी सेंट्रल रेल्वे मजदूर संघाने (सीआरएमएस) सीएसएमटी येथे ६ नोव्हेंबर रोजी आंदोलन केले. यावेळी आंदोलकांनी मोटरमनचे दालन अडवून, लोकल सेवा बंद पाडली. त्यावेळी नाईलाजाने सँडहर्स्ट रोड येथे रेल्वे रुळांवरून चालत जाणाऱ्या प्रवाशांना अचानक सुरू झालेल्या लोकलने धडक दिली आणि या अपघातात दोन प्रवासी ठार झाले. यात सहभागी असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांविरुद्ध निलंबनाची, शिस्तभंगाची आणि कायदेशीर कारवाई करावी अशी तक्रार प्रवासी अक्षय महापदी यांनी केली.

## मोखाड्याच्या तोरंगण घाटात टेम्पोचा अपघात; एकाचा मृत्यू

पालघर : नाशिक डहाणू राज्यमार्गावर मोखाडा जवळील तोरंगण घाटात टेम्पोला झालेला अपघातात एका प्रवाशाचा मृत्यू झाला असून ३० पेक्षा अधिक जण जखमी झाले आहेत. जखमी मजुरांवर विविध शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. नाशिक परिसरात मजुरीसाठी गेलेले कामगार परतीच्या वाटेवर असताना हा भीषण अपघात घडला. नाशिक डहाणू राज्यमार्गावरील मोखाडा हद्दीत असलेल्या तोरंगण घाटातील उतारावर गुरुवारी संध्याकाळी सात वाजेच्या सुमारास ब्रेक फेल होऊन होऊन टेम्पो उलटला. अपघातामध्ये सुभाष दिवे (२८) रा. हाडे ता. जव्हार या मजुराचा दुर्दैवी मृत्यू झाला असून या अपघातात ३० पेक्षा अधिक मजूर जखमी झाले आहेत. टेम्पोला अपघात झाल्याचे समजतात मोखाडा येथील पोलीस कर्मचारी, शासकीय यंत्रणा आणि परिसरातील राजकीय व सामाजिक कार्यकर्ते व स्थानिक नागरिकांनी तातडीने अपघात स्थळी धाव घेऊन मदत कार्य सुरू केले. जखमींपैकी पाच जणांना नाशिक येथील शासकीय रुग्णालय, सात जणांना त्र्यंबकेश्वर ग्रामीण रुग्णालय तर इतर जखमींना मोखाडा ग्रामीण रुग्णालयात रुग्णवाहिकांमधून उपचारासाठी दाखल करण्यात आले. अपघात प्रसंगी मजुरानी घाबरून टेम्पो बाहेर उड्या मारल्याने अनेकांच्या हाता पायाला दुखापत झाली आहे.

## केंद्रीय विद्यालय संघटन

■ पदाचे नाव & तपशील:
1 असिस्टंट कमिश्नर
2 प्रिंसिपल
3 वाइस प्रिंसिपल
4 पदव्युत्तर शिक्षक (PGT)
5 प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (TGT)
6 लायब्रेरियन
7 प्राथमिक शिक्षक (PRTs)
8 अॅडमिनिस्ट्रेटिव ऑफिसर
9 फायनान्स ऑफिसर
10 असिस्टंट इंजिनिअर
11 असिस्टंट सेक्शन ऑफिसर
12 ज्युनियर ट्रान्सलेटर
13 सिनिअर सेक्रेटेरिएट असिस्टंट
14 ज्युनियर सेक्रेटेरिएट असिस्टंट
15 स्टेनो ग्रेड
16 स्टेनो ग्रेड II
17 असिस्टंट कमिश्नर
18 प्रिंसिपल
19 पदव्युत्तर शिक्षक (PGT)
20 पदव्युत्तर शिक्षक (PGT) (Modern Indian Language)
21 प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (TGT)
22 प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (TGT) (3rd Language)
23 ज्युनियर सेक्रेटेरिएट असिस्टंट (HQ/RO Cadre)
24 ज्युनियर सेक्रेटेरिएट असिस्टंट (JNV Cadre)
25 लॅब अटेंडंट
26 मल्टी टास्किंग स्टाफ (MTS)

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.1: (i) 50% गुणांसह पदव्युत्तर पदवी (ii) B.Ed (iii) 03 वर्षे अनुभव.
पद क्र.2: (i) 50% गुणांसह पदव्युत्तर पदवी (ii) B.Ed (iii) अनुभव.
पद क्र.3: (i) 50% गुणांसह पदव्युत्तर पदवी (ii) B.Ed (iii) अनुभव.
पद क्र.4: (i) 50% गुणांसह संबंधित विषयात पदव्युत्तर पदवी (ii) B.Ed
पद क्र.5: (i) 50% गुणांसह संबंधित विषयात पदवी (ii) B.Ed.
पद क्र.6: 50% गुणांसह लायब्ररी सायन्स पदवी किंवा लायब्ररी अँड इन्फॉर्मेशन सायन्स पदवी
पद क्र.7: (i) 50% गुणांसह 10वी /12वी उत्तीर्ण (ii) संबंधित विषयात पदवी
पद क्र.8: (i) पदवीधर (ii) केंद्रीय सरकार/केंद्रीय सरकारच्या स्वायत्त संस्थांमध्ये किमान वेतन लेव्हल-7 मध्ये विभाग अधिकारी म्हणून तीन वर्षांची नियमित सेवा.
पद क्र.9: (i) 50% गुणांसह B.Com/M.Com (ii) वेतन लेव्हल-6 किंवा त्याच्या समतुल्य मध्ये केंद्र/राज्य सरकार/केंद्र/राज्य सरकारच्या स्वायत्त संस्थेत 04 वर्षे अनुभव
पद क्र.10: (i) B.E (Civil/Electrical) (ii) 02 वर्षे अनुभव.
पद क्र.11: (i) पदवीधर (ii) केंद्रीय सरकार/केंद्र सरकारच्या स्वायत्त संस्थांमध्ये लेव्हल 4 मध्ये किमान 3 वर्षे (Rs.25500-Rs. 81100/) नियमित आधारावर UDC/SSA किंवा समकक्ष म्हणून काम.
पद क्र.12: (i) इंग्रजीसह हिंदी पदव्युत्तर पदवी (ii) ट्रांसलेशन डिप्लोमा किंवा 02 वर्षे अनुभव
पद क्र.13: (i) पदवीधर (ii) केंद्रीय सरकार/केंद्र सरकारच्या स्वायत्त संस्थांमध्ये लेव्हल 3 मध्ये किमान 2 वर्षे (Rs.19900-63200/-) नियमित आधारावर UDC/SSA किंवा समकक्ष म्हणून काम.
पद क्र.14: (i) 12वी उत्तीर्ण (ii) इंग्रजी टायपिंग 35 श.प्र.मि. किंवा हिंदी टायपिंग 30 श.प्र.मि.
पद क्र.15: (i) पदवीधर (ii) इंग्रजी/हिंदी शॉर्टहैंड 100 श.प्र.मि. व इंग्रजी/हिंदी टायपिंग 45 श.प्र.मि. (iii) केंद्र/राज्य सरकार/केंद्र/राज्य सरकारच्या स्वायत्त संस्थांमध्ये स्टेनोग्राफर ग्रेड II म्हणून 05 वर्षे नियमितपणे वेतन लेव्हल 4वर काम
पद क्र.16: (i) पदवीधर (ii) कौशल्य चाचणी नियम: डिक्टेशन: 10 मिनिटे @ 80 श.प्र.मि., लिप्यंतरण: संगणकावर 50 मिनिटे (इंग्रजी) किंवा 65 मिनिटे (हिंदी).
पद क्र.17: (i) 50% गुणांसह पदव्युत्तर पदवी (ii) B.Ed (iii) 03 वर्षे अनुभव.
पद क्र.18: (i) 50% गुणांसह पदव्युत्तर पदवी (ii) B.Ed (iii) अनुभव.
पद क्र.19: (i) 50% गुणांसह संबंधित विषयात पदव्युत्तर पदवी (ii) B.Ed
पद क्र.20: (i) 50% गुणांसह संबंधित विषयात पदव्युत्तर पदवी (ii) B.Ed
पद क्र.21: (i) 50% गुणांसह संबंधित विषयात पदवी (ii) B.Ed.
पद क्र.22: (i) 50% गुणांसह संबंधित विषयात पदवी (ii) B.Ed.
पद क्र.23: (i) 12वी उत्तीर्ण (ii) इंग्रजी टायपिंग 30 श.प्र.मि. किंवा हिंदी टायपिंग 25 श.प्र.मि.
पद क्र.24: (i) 12वी उत्तीर्ण (ii) इंग्रजी टायपिंग 30 श.प्र.मि. किंवा हिंदी टायपिंग 25 श.प्र.मि.
पद क्र.25: 10वी उत्तीर्ण + लॅब टेक्निक प्रमाणपत्र/डिप्लोमा किंवा 12वी (Science)
पद क्र.26: 10वी उत्तीर्ण

वयाची अट: 04 डिसेंबर 2025 रोजी, [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
पद क्र.1: 50 वर्षांपर्यंत
पद क्र.2, 18: 35 ते 50 वर्षे
पद क्र.3: 35 ते 45 वर्षे
पद क्र.4, 19, & 20: 40 वर्षांपर्यंत
पद क्र.5, 6, 9, 10, 11, 21 & 22: 35 वर्षांपर्यंत
पद क्र.7, 12, 13, 15, 25 & 26: 30 वर्षांपर्यंत
पद क्र.8 & 17: 45 वर्षांपर्यंत
पद क्र.14, 16, 23 & 24: 27 वर्षांपर्यंत
नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
Fee: [SC/ST/PWD/ExSM: ₹500/-]
पद क्र.1,2, 3, 17 & 18: General/OBC/EWS: ₹2800/-
पद क्र.4 ते 12, 19,20, 21 & 22: General/OBC/EWS: ₹2000/-
पद क्र.13 ते 16 & 23 ते 26: General/OBC/EWS: ₹1700/-
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 04 डिसेंबर 2025 (11:50 PM)
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत संकेतस्थळ https://kvsangathan.nic.in/

## RITES लिमिटेड

■ पदाचे नाव & तपशील:
1 पदवीधर अप्रेंटिस
2 डिप्लोमा अप्रेंटिस
3 ट्रेड अप्रेंटिस (ITI)
■ शैक्षणिक पात्रता: [General/EWS: 60% गुण, SC/ST/OBC/PWD: 50% गुण]
पदवीधर अप्रेंटिस: B.E/B.Tech (Civil/Architecture/Electrical/Signal & Telecom/ Mechanical/ केमिकल/मेटलर्जी) किंवा BA/BBA/B.Com/BCA
डिप्लोमा अप्रेंटिस: इंजिनिरिंग डिप्लोमा (Civil/Electrical/Mechanical/Chemical / Metallurgical)
ट्रेड अप्रेंटिस: ITI (Civi/Mechanical/ Electrical(
■ वयाची अट: 17 नोव्हेंबर 2025 रोजी किमान 18 वर्षे पूर्ण.
■ Fee: फी नाही.
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
■ महत्त्वाच्या तारखा:
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 05 डिसेंबर 2025
■ अधिकृत संकेतस्थळ https://www.rites.com/

## मिरा भाईंदर पालिकेत अर्बन हॅबिटॅट रिस्क रिझिलिअन्स प्रोग्रामचा आढावा बैठक

भाईंदर : गेल्या काही वर्षात मिरा-भाईंदरमध्ये वेगाने वाढ झाली अधिक इमारती, कमी मोकळी मैदाने आणि वाढते तापमान, पूर, उष्णता, प्रदूषण आणि शहराच्या पायाभूत सुविधा यांचा लोकांच्या दैनंदिन जीवनावर कसा परिणाम होतो याचा अभ्यास करून सिटी ऍक्शन प्लॅन विकसित करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक राधाविनोद अ. शर्मा (भा. प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आगा खान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया (AKAHI) यांच्या प्रमुख उपस्थितीत २१ नोव्हेंबर २०२५ रोजी महानगरपालिका मुख्यालयात शहराच्या हवामान बदल या संदर्भात एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक संपन्न झाली.

शहरातील वाढते तापमान, पावसाळ्यातील जलसंकट, नागरी भागातील बदल आणि रहिवाश्यांच्या दैनंदिन जीवनावर होणारे परिणाम यांचा सखोल अभ्यास व त्यावर उपाययोजना या बैठकीत मांडण्यात आला. बैठकीत क्लायमेट अॅक्शन प्लॅन, अर्बन हॅबिटॅट रिस्क रिझिलिअन्स प्रोग्राम (UHRRP) आणि त्यांची शहराला हवामान बदलाच्या आव्हानांपासून वाचवण्यासाठी होणारी उपयुक्तता यावर अर्थपूर्ण चर्चा करण्यात आली. या कार्यक्रमाचा मुख्य आकर्षण म्हणजे मिरा भाईंदर महानगरपालिका व आगा खान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया (AKAHI) यांच्यात झालेला एमओयू स्वाक्षरी समारंभ होय. शहराच्या सुरक्षित, आणि हवामान-तटस्थ भविष्यासाठी दोन्ही संस्था एकत्र काम करणार आहेत.

या कराराद्वारे शहरातील उष्णतेचे व्यवस्थापन, शहरातील पावसाचे पाणी शोषण व व्यवस्थापन, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, तसेच सर्व समुदाय आधारित आपत्कालीन प्रतिसाद क्षमता वाढविण्यासाठी शहरात विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. या कार्यक्रमाच्या दरम्यान मा. आयुक्त यांच्या हस्ते क्लायमेट अॅक्शन प्लॅन या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले यावेळी आयुक्तांनी मिरा भाईंदर शहराला उष्णता पूर आणि इतर हवामान संबंधित आव्हानापासून सुरक्षित ठेवण्यासाठी करण्यात येणारे उपाय हे तात्पुरते न करत कायम स्वरूपी कसे करता येईल तसेच त्यात काय महत्त्वाच्या सुधारणा करता येईल त्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासन व आगा खान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया (AKAHI) विविध उपक्रम राबविणार आहेत.



या उपक्रमामुळे दैनंदिन जीवन अधिक आरामदायी होऊन वातावरण अधिक सुरक्षित होईल. पावसात शहर अधिक स्वच्छ हिरवे आणि आरोग्यदायी तसेच सर्व संघटना आणि महानगरपालिकेच्या क्षेत्रातील संघटना मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासन हवामान बदलाशी सामना करण्यासाठी विविध उपक्रमातील राबविल्यामुळे मिरा भाईंदर शहर एक महत्त्वाच आदर्श शहर बनू शकेल असा विश्वास यावेळी त्यांनी मा. आयुक्तांनी व्यक्त केला आहे. हि आढावा बैठक आणि पुस्तक प्रकाशन सोहळ्याला उपायुक्त (मुख्यालय) डॉ. सचिन बांगर, शहर अभियंता दिपक खांबित, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग) शरद नाणेगावकर, अतिक्रमण विभाग प्रमुख नरेंद्र चव्हाण, सहायक आयुक्त योगेश गुणीजन तसेच आगा खान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीम. प्रेरणा लांगा व विभागप्रमुख जुबेर शेख हे उपस्थित होते.



विटावा गणपती विसर्जन घाटावर ठेवण्यात आलेल निर्माल्य कलश अत्यंत दुरावस्थेत असून या ठिकाणी राडारोडा, कचरा, भंगार साहित्य इतस्ततः पसरलेला दिसत आहे. घाटावर निर्माल्य टाकण्यासाठी आलेल्या नागरिकांची त्यामुळे गैरसोय होत आहे. हे निर्माल्य कलश उलटे करून ठेवल्यामुळे नागरिक त्यांच्यावरच कचरा टाकत आहेत. (छाया : अशोक घाग)

## नगरपरिषद क्षेत्रात कचरा टाकणाऱ्यावर डिसेंबरपासून दंडात्मक कारवाई; 'कचरा स्पॉट' संपवण्याचे आरोग्य विभागाचे ध्येय

पालघर : पालघर नगरपरिषद क्षेत्रातील मुख्य रस्त्यांवर ठीकठिकाणी तयार झालेले कचरा स्पॉट कायमस्वरूपी बंद करण्यासाठी नगरपरिषद आता कठोर भूमिका घेण्याच्या तयारीत आहे. घरोघरी जनजागृती, कचरामुक्ती फलक आणि देखरेखीसाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करूनही नागरिक उघड्यावर कचरा टाकत असल्याने, डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून कठोर दंडात्मक कारवाई सुरू करण्यात येणार आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी पालघर जिल्हा स्वच्छ करण्याचा नारा दिला असला तरी, छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून मुख्यालयाचा मार्ग, रेल्वे स्टेशन, माहीम आणि पालघर-मनोर मार्गावर उघड्यावर कचरा टाकण्याचे प्रमाण वाढले आहे. या कचऱ्यात प्लास्टिक पिशव्यांचे प्रमाण अधिक असून यामुळे गुरेढोरे आणि इतर जनावरांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

पालघर नगरपरिषद क्षेत्रात सध्या १६ घंटागाड्या कार्यरत असून, प्रत्येक गाडीकरिता तीन स्वच्छता कर्मचारी नियुक्त आहेत. याव्यतिरिक्त, रस्ता, भाजीबाजार व इतर उघड्यावरील कचरा उचलण्यासाठी पाच टिपर (मिनी ट्रक) असून, याकरिता २५ कर्मचारी कार्यरत आहेत. घंटागाडी दररोज घरोघरी, चाळीत व गृहसंकुलांमध्ये पाच ते दहा मिनिटे थांबून कचरा संकलित करते, तसेच टिप्परद्वारे रस्त्यावरील कचरा उचलला जातो. मात्र, सकाळी १०-११ वाजेपर्यंत कचरा उचलल्यानंतर सायंकाळपर्यंत परिस्थिती पूर्ववत होऊन पुन्हा कचऱ्याचे ढिगारे तयार होतात. घंटागाडीच्या वेळेत कचरा न देणाऱ्या आणि गाडी गेल्यावर कचरा आणून उघड्यावर फेकणाऱ्या नागरिकांचा यात अधिक समावेश आहे.

स्वच्छ भारत अभियानाच्या सुरुवातीनंतर २०१४ मध्ये रोगराई आणि अयोग्य व्यवस्थापनाला आळा घालण्यासाठी रस्त्यावरील मोठ्या कचराकुंड्या बंद करण्यात आल्या. शासनाचा उद्देश चांगला असूनही, ज्या ठिकाणी पूर्वी कचराकुंड्या होत्या, त्याच ठिकाणी नागरिक बिनधास्तपणे कचरा टाकत असल्याचे दिसून येत आहे, ज्यामुळे रोगराईचा धोका कायम आहे.

आरोग्य विभागाकडून सकाळी ७ वाजेपासूनच घंटागाड्या आणि टिप्परद्वारे कचरा संकलित करण्यास सुरुवात होते. पालघर रेल्वे स्थानकाजवळील भाजी बाजाराबाहेरील घाऊक बाजारपेठ संपल्यानंतर होणारा कचरा उचलण्यात अधिक वेळ जातो, तरीही सकाळी लवकर शहर स्वच्छ करण्यावर आरोग्य विभागाचा भर आहे.

आरोग्य विभागाने नागरिकांना विशेष आवाहन केले आहे की, जर दररोज घंटागाडी येत नसेल, किंवा कोणत्या भागात फिरत नसेल, तर त्या भागातील मुकादम किंवा नगरपरिषदेकडे त्वरित तक्रार करावी.

आरोग्य विभागाने यापूर्वी अनेकदा जनजागृती केली आहे. आता दंडात्मक कारवाई करताना पहिले समज देण्यावर भर दिला जाणार आहे. कचरा टाकू नये असे फलक लावूनही वारंवार कचरा टाकणाऱ्या नागरिकांकडून २८० रुपये दंड आकारला जातो. तर दुकानदार त्यांच्या दुकानाबाहेर दूकानातील कचरा टाकताना आढळल्यास १००० रुपये दंड आकारण्यात येतो.

टोरेंट पॉवर आणि एमएसईडीसीएल
शीळ-मुंब्रा-कळवा (एसएमके) आणि भिवंडी येथे

## विशेष ग्राहक सेवा शिबीरचे आयोजन

प्रमोद कुमार

ठाणे : भिवंडी आणि शीळ-मुंब्रा-कळवा (एसएमके) परिसरातील एमएसईडीसीएलची फ्रँचायझी असलेली टोरेंट पॉवर लिमिटेड नेहमीच आपल्या ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देण्यासाठी वचनबद्ध आहे. या उपक्रमाच्या अनुषंगाने, टोरेंट पॉवर ग्राहकांच्या सोयीसाठी विशेष ग्राहक सेवा शिबिरे आयोजित करत आहे.

शिबिराचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे: २५ नोव्हेंबर रोजी शीळ-मुंब्रा-कळवा (एसएमके) टोरेंट ग्राहक सेवा केंद्र, अरिहंत आरोही इमारत, कल्याण-शीळ रोड येथे तर २६ नोव्हेंबर रोजी भिवंडी टोरेंट ग्राहक सेवा केंद्र, अर्श रेसिडेन्सी, चवींद्र रोड, अम्पाडा सकाळी १०:३० ते सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत ग्राहकांच्या समस्या आणि विविध प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी टोरेंट पॉवर आणि महावितरण विभागाचे अधिकारी या शिबिरांमध्ये उपस्थित राहतील. ग्राहक या संधीचा वापर करून कोणत्याही प्रलंबित समस्या सोडवू शकतात. ज्यात महावितरण विभागाशी संबंधित समस्यांचा समावेश आहे. टोरेंट पॉवर ग्राहकांना या विशेष शिबिराचा पुरेपूर लाभ घेण्याचे आवाहन करते. अधिक माहितीसाठी, ग्राहक टोरेंट पॉवर हेल्पलाइनवर संपर्क साधू शकतात.

# हेल्मेट वापरासाठी समाजात व्यापक जनजागृती आवश्यक:जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ

ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात 'हेल्मेट मॅन ऑफ इंडिया' यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना हेल्मेट वाटप

ठाणे (गणेश भोईटे) : रस्ते अपघातांत मृत्यू पावणाऱ्यांमध्ये तरुणांचा वाढता सहभाग चिंताजनक असून त्यावर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी हेल्मेट वापराविषयी समाजात मोठ्या प्रमाणावर जनजागृती होणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले. ठाणे जिल्हाधिकारी आवारातील जिल्हा नियोजन भवनातील सभागृहात चित्रमेध व्हिजन आणि जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय, पोलीस विभाग, उपप्रादेशिक परिवहन विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हेल्मेट वितरण कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमाला 'हेल्मेट मॅन ऑफ इंडिया' म्हणून परिचित असलेले राघवेंद्र कुमार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तसेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिका आयुक्त अभिनव गोयल, उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त मनिषा आव्हाळे, भिवंडी महानगरपालिका




आयुक्त अनमोल सागर, लेफ्टनंट कर्नल विवेक तिवारी, आयटी तज्ञ पवन द्विवेदी, लेफ्टनंट कर्नल मोहित गौर (निवृत्त), जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के, चित्रमेध व्हिजनचे आयोजक बबन लाटे व विशाल लाटे यांच्यासह मोठ्या संख्येने ठाणे पोलीस स्कूलचे प्राथमिक विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

या उपक्रमाचे कौतुक करताना जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ म्हणाले, "ठाण्यात लहान मुलांना हेल्मेट वाटपाचा असा उपक्रम प्रथमच राबविला जात आहे, ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे.सर्वसाधारणपणे १८ वर्षांनंतर वाहन चालविण्यास पात्र झाल्यावर तरुणांमध्ये हेल्मेटचा वापर वाढतो. परंतु राघवेंद्र कुमार यांनी मांडलेली 'लहानपणापासून हेल्मेटची सवय' ही संकल्पना मुलांमध्ये सुरक्षिततेची जाण निर्माण करणारी आहे. आज मुलांमध्ये जागरूकता निर्माण झाली, तर भविष्यात ते स्वतः हेल्मेटचा योग्य वापर करतील आणि समाजातही त्याचा प्रसार करतील."

रस्ते अपघातातील मृत्यूचे वाढते प्रमाण गंभीर असून हेल्मेटचाच वापर हे त्यावरील सर्वात सोपे व प्रभावी उपाय आहे, असेही त्यांनी नमूद केले. तसेच राघवेंद्र कुमार यांच्या २ लाख हेल्मेट वितरण मोहिमेची प्रशंसा करत त्यांना शुभेच्छाही दिल्या.

कार्यक्रमात हेल्मेट घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी घरी गेल्यावर आपल्या पालकांना आणि नातेवाईकांना हेल्मेट न घालण्याचे धोके आणि वापराचे महत्त्व समजावून सांगावे, तसेच विनाहेल्मेट दिसणाऱ्या व्यक्तींना योग्य मार्गदर्शन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी विद्यार्थ्यांना केले.

राघवेंद्र कुमार यांनी या उपक्रमाचा उगम कसा झाला, तसेच हेल्मेट वापराचा प्रसार करण्यामागील अनुभव सांगितला. ते म्हणाले, "लहानपणापासून मुलांना हेल्मेटची सवय लावली, तर ते मोठे झाल्यावर कोणतेही वाहन कधीच विनाहेल्मेट चालवणार नाहीत. त्यामुळे भविष्यातील अपघाती मृत्यूचे प्रमाण निश्चितच कमी होईल."

या कार्यक्रमात जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांनी वीर शहीद कॅप्टन विनायक गोरे यांच्या जीवनावरील प्रसंगावर देशप्रेमावर आधारित एकपात्री एकांकिका सादर केली. या सादरीकरणातून विद्यार्थ्यांना देशभक्तीचा प्रभावी संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांना प्रतिकात्मकरित्या हेल्मेट देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदक पटकविलेल्या शौर्या अंबुरे या विद्यार्थीनीचा जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

## राष्ट्रवादी शरद पवार पक्षाची संदीप नाईक यांना खुली ऑफर

उमेदवार उभे करण्यासाठी पुढाकार घ्या, आम्ही पक्षात स्वागत करू



नवी मुंबई : माजी आमदार संदीप नाईक यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने खुली ऑफर दिली असून नवी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीमध्ये संदीप नाईक यांनी उमेदवार उभे करण्यासाठी पुढाकार घेतल्यास आपण त्यांचे स्वागतच करू, असं विधान या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी केले आहे.

ऐरोली मतदार संघातून दोन टर्म आमदार राहिलेले संदीप नाईक यांनी 2024 च्या विधानसभा निवडणुकीमध्ये बेलापूर विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या माध्यमातून निवडणूक लढवली. आणि तब्बल 97 हजार मते प्राप्त केली. अवघ्या 377 मतांनी त्यांचा निसटता पराभव झाला. संदीप नाईक यांना नवी मुंबईत मानणारा मोठा वर्ग आणि जनाधार आहे. भारतीय जनता पक्षाच्या नवी मुंबई जिल्हा अध्यक्षपदी काम करताना त्यांनी नवी मुंबईमध्ये पक्षाची जोरदार बांधणी केली होती. संदीप नाईक यांच्या भाजपा प्रवेशाच्या चर्चा सतत सुरू असतात. मात्र अद्याप पर्यंत त्यांचा भाजपा प्रवेश प्रलंबित असल्याचे दिसून येते. नवी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाला मोठा फायदा होऊ शकतो असे बोलले जात आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसने संदीप नाईक यांच्या नेतृत्वाचा नवी मुंबई पालिका निवडणुकीमध्ये उपयोग करून घेण्याच्या दृष्टीने पुन्हा एकदा त्यांना आवाहन केले आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये संदीप नाईक यांच्या प्रवेशाने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला नवी मुंबईमध्ये मोठी ताकद मिळाली होती. नवी मुंबई महापालिकेच्या आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली असताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने देखील रणनीती आखली आहे. त्याचाच एक भाग म्हणून संदीप नाईक यांच्यासारख्या मातोब्बर नेत्याला सामील करून घेण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केलेले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसने दिलेल्या ऑफरवर संदीप नाईक काय प्रतिसाद देतात? हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल.

पनवेल महापालिकेत दिवाळीनंतरही दिवाळी

## सफाई कर्मचारी झाले लिपिक टंकलेखक

पनवेल : दिवाळी नंतरही घरामध्ये दिवाळी साजरी करण्याची संधी पनवेल महापालिकेच्या काही सफाई कर्मचाऱ्यांना व त्यांच्या



कुटूंबियांना मिळाली आहे. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी मनपाच्या 12 सफाई कर्मचाऱ्यांना आस्थापना विभागामार्फत लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार विविध विभागातील लिपिक टंकलेखक पदाची रिक्त पदे भरण्यासाठी नियुक्तीला मान्यता देण्यात आली आहे. राज्य शासनाकडून आलेल्या 09 जून 2025 च्या परिपत्रकानुसार सेवाविषयक बाबींच्या अनुषंगाने 150 दिवसांचा सेवाकर्मी कार्यक्रम राबविण्याबाबत सूचना प्राप्त आहेत. यानुसार आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेप्रमाणे अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबींच्या सुधारणांकरीता पनवेल महानगरपालिका प्रयत्नशील आहे. याचाच भाग म्हणून अनुकंपा/लाड पागे वारसा नियुक्ती प्राधान्याने पूर्ण करण्यात आली आहे. महापालिका स्थापनेपासून वेगवेगळ्या संवर्गातील एकूण 12 कर्मचाऱ्यांना पालिकेकडून लाड पागे शिफारसीनुसार नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांमध्ये अतुल मोहकर, अक्षता रोकडे, रोहन डुलगज, सागर हातळुनकर, अभिजीत जाधव, स्वप्नील कांबळे, मनीष मोरे, नितेश जाधव, अनुष जाधव, राजू मजुंळे, रसिका जाधव, कल्पेश माने यांचा समावेश आहे.

समितीच्या निर्णयानुसार हे सर्व १२ कर्मचारी संबंधित वर्ग-३ पदांच्या कार्यभारावर आज रुजू झाले असून परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या विशेष प्रयत्नातून त्यांना नियुक्ती आदेश महापालिकेकडून जारी करण्यात आले आहे. महापालिकेने ही बदली नियुक्ती प्रक्रिया पारदर्शकपणे आणि शासकीय सेवेनियमांनुसार केल्याचे सांगितले आहे.




## नजीब मुल्ला यांच्या आश्वासनानंतरही कोणताही तोडगा निघालेला नाही

क्रीडा परिषदेचे उपोषण तिसऱ्या दिवशीही सुरू

मुंब्रा: मुंब्रा कौसा क्रीडा परिषदेच्यावतीने रशीद खान, जावेद खान, झहीर सय्यद आणि जावेद सय्यद या चार तरुणांनी खुल्या खेळाच्या मैदानाची मागणी करत उपोषण सुरू केले. दुर्दैवाने, उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी, दुपारी ३:३० च्या सुमारास, टीएमसीचे एक डॉक्टर तपासणीसाठी आले. चार तरुणांपैकी जावेद सय्यद यांची प्रकृती कमी मधुमेहामुळे बिघडली. त्यांना उपचारासाठी सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले, तर इतर तीन तरुण त्यांच्या मागण्यांवर ठाम आहेत. तथापि, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ठाणे जिल्हाध्यक्ष अजितदादा पवार गटाचे नजीब मुल्ला यांनी आश्वासन दिले की, त्यांच्या तीन मागण्यांपैकी तिसरी मागणी म्हणजे चांद नगर संकुलातील अमीनाबाद एसटीपीजवळील सर्वे क्रमांक ३१ आणि ३२ मधील जमीन १५ दिवसांच्या आत मुलांना खेळण्यासाठी देण्यात येईल, त्यातील ढिगारा काढून, दोन फूट नवीन माती भरून आणि समोरील गटार काढून अमृत नगर दर्गा रोडच्या मागे असलेली जमीन तत्काळ मुलांना खेळण्यासाठी देण्यात येईल. दुसरी मागणी म्हणजे मुंब्रा विभाग समितीच्या समोर असलेल्या आणि मनोरंजन स्थळ असलेल्या सर्वे क्रमांक ५६, ५७, ५८, ५९ आणि ६१ मधील जमीन निवासी क्षेत्रात रूपांतरित केली जात आहे. त्या रूपांतरणाची बाब ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव यांच्या हातात नाही. आणि सर्वेक्षण क्रमांक ५० एपीटी, ११९ एपीटी, १२० एपीटी, ४८ पीटी, ही जमीन, १२१ पीटी, पाम रिवेरिया डेव्हलपर्सने व्यापलेली आहे आणि खेळाच्या मैदानाची जमीन एमसीएला देण्यात आली आहे. ती जमीन परत मिळवण्यासाठी मी एमसीएचे अध्यक्ष अजिंक्य नाईक यांच्याकडे बोलेन आणि शक्य असल्यास अजित यांच्याशीही बोलेन.

दादा पवार आणि शरद पवार जरी आपल्याला जावे लागले तरी आपण सर्वजण एकत्र जाऊन मुंब्राच्या मुलांना खुल्या खेळाच्या मैदानाच्या हक्कासाठी लढू. तुम्ही सर्वांनी तुमचे उपोषण थांबवावे आणि माझ्यावर विश्वास ठेवावा, कारण सध्या नगर परिषद आणि नगरसेवकांच्या निवडणुका सुरू आहेत आणि सर्व अधिकारी निवडणुकांमध्ये व्यस्त आहेत. शक्य असल्यास, मी उद्या ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव यांना भेटण्याचा प्रयत्न करेन. जर आपण भेटलो तर हा प्रश्न निश्चितच सोडवला जाईल. तथापि, क्रीडा परिषदेच्या तीन सदस्यांनी नजीब मुल्ला यांनी दिलेल्या आश्वासनांवर विश्वास ठेवला नाही आणि दोन्ही बाजूंनी अद्याप कोणताही करार झालेला नाही. सध्या समर्थन परिषद बेमुदत उपोषणावर आहे आणि मुंब्रा पोलिसांनी फक्त एका दिवसासाठी परवानगी दिली होती आणि आता ३ दिवस झाले आहेत, समर्थन परिषद आपले अनिश्चित उपोषण कसे सुरू ठेवते हे पाहणे बाकी आहे, त्यांच्या तीन मागण्या सरकारी प्रशासनाकडून पूर्ण होतील का, हे पाहणे गरजेचे आहे.

## प्रोस्टेट ग्रंथी वाढीच्या आजाराबाबत छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात जनजागृती शिबिराचे आयोजन




ठाणे (मेधा भोईटे) : प्रोस्टेट ग्रंथी वाढीचा आजार हा वाढत्या वयानुसार पुरूषांमध्ये जास्त प्रमाणात पहावयास मिळतो. या आजाराची लक्षणे मोठ्या प्रमाणात पन्नाशीच्या वरील पुरूषांमध्ये आढळून येतो. जागतिक पडताळणीमध्ये या वाढ झालेल्या प्रोस्टेट ग्रंथी मध्ये कर्करोगाचे प्रमाण लक्षणीय असल्याचे आढळून आले आहे, प्रोस्टेट ग्रंथीच्या वाढीवर रोबोटिक साधनाच्या माध्यमातून शस्त्रक्रिया करणे सुलभ असल्याचे युरॉलॉजिस्ट डॉ. हर्षवर्धन गोडबोले यांनी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात आयोजित शिबीरात व्यक्त केले.

या कार्यक्रमास ज्येष्ठ अभिनेते डॉ. गिरीष ओक, ज्येष्ठ पत्रकार मिलींद बल्लाळ रुग्णालयाच्या अधिष्टांत्री डॉ. स्वप्राली कदम तसेच ऑपथल विभागाचे प्रमुख डॉ. राकेश बारोट आदी उपस्थित होते.

जगभर नोव्हेंबर महिन्यातील एक आठवडा प्रोस्टेट जनजागृती आठवडा साजरा केला जातो. हा आठवडा ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातही नुकताच साजरा करण्यात आला, या निमित्ताने लंडन येथील युरॉलॉजिस्ट डॉ. हर्षवर्धन गोडबोले यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमास अभिनेते डॉ. गिरीष ओक, ज्येष्ठ पत्रकार मिलींद बल्लाळ आदी उपस्थित होते.

या शिबिरात एकूण या आजाराने बधित असलेल्या 50 रुग्णांची तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करण्यात आली. रक्त तपासणी व या आजरा संबंधी लागणाऱ्या विशिष्ट तपासणी करून रुग्णांना औषध व इतर उपचारा संबंधी योग्य मार्गदर्शन करण्यात आले. रुग्णालयात प्रोस्टेट आजारावर वेळोवेळी रुग्णांना तपासणी करून औषधोपचार केले जातात. या शिबिरामुळे जनमाणसात प्रोस्टेट आजरा संबंधी जनजागृती होण्यास मदत झाली.

**स्तुत्य उपक्रम- अभिनेते गिरीष ओक**

"प्रोस्टेट ग्रंथीचा आजाराचे प्रमाण हे पुरूषांमध्ये जास्त असल्याचे दिसून येते. या आजारावर वेळीच उपचार घेणे गरजेचे असून छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाने नागरिकांमध्ये जनजागृती करण्याच्या दृष्टीने अशा प्रकारच्या शिबीराचे आयोजन केले हा अत्यंत स्तुत्य उपक्रम असल्याचे प्रतिपादन अभिनेते डॉ.गिरीष ओक यांनी केले. तर ज्येष्ठ पत्रकार मिलिंद बल्लाळ यांनीही या उपक्रमाचे कौतुक केले.

कल्याण-डोंबिवलीत स्वच्छतेचा नवा अध्याय

## वारंवार कचरा पडणाऱ्या शहरातील ठिकाणांचे स्वच्छतेसह सुशोभीकरण सुरू !

रस्त्यावर कचरा टाकण्याऐवजी घंटागाडीमध्ये देण्याचे, महापालिकेचे आवाहन !

कल्याण : कल्याण डोंबिवली परिसरातील अस्वच्छता निर्मुलनाबाबत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. याच प्रयत्नांमध्ये आता आणखी एका नव्या अध्यायाची भर पडली असून, महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या संकल्पनेतून शहरात वारंवार कचरा पडणारी ठिकाणे (Garabage Vulnerable Points) स्वच्छ करून सुशोभित करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे.

त्यासाठी महापालिका परिक्षेत्रातील अनोखी शक्कल लढवत अशा वारंवार कचरा पडणाऱ्या ठिकाणांना (GVP) कायमस्वरूपी स्वच्छ राखण्याच्या दिशेने एक मोहीम हाती घेतली आहे. त्याअंतर्गत कल्याण पश्चिमेतील बारावे जलशुध्दीकरण केंद्र परिसर, बारावे गाव या दोन आणि ठाकुर्ली पूर्वेच्या स्टेशन रोड परिसरात एका ठिकाणाचे सुशोभीकरण करण्यात आले आहे. कल्याणातील 3 प्रभागात महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांमार्फत तर उर्वरित 7 प्रभागांमध्ये सुमित एल्कोप्लास्ट कंपनीच्या सफाई कर्मचाऱ्यांच्या



माध्यमातून ही मोहीम राबविण्यात येत आहे.

Garabage Vulnerable Points मागची कारणे शोधण्यासाठी महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने शोधमोहीम सुरू केली असून, मोकळ्या जागेवर रात्रीच्या वेळेत कचरा पडत असल्याचे निदर्शनास आल्याची माहिती उपआयुक्त रामदास कोकरे यांनी दिली.

कल्याण डोंबिवलीतील अशा भागांमध्ये आता रात्रीच्या सत्रात महापालिकेकडून घंटागाडी पाठवण्यात येत आहे. जेणेकरून रस्त्यावर पडणारा कचरा बंद होईल. अशा प्रकारे महापालिका कर्मचाऱ्यांकडून कचरामुक्त आणि स्वच्छ केलेले Garabage Vulnerable Points आकर्षक दिसणार आहेत. या ठिकाणांवर आकर्षक रंगांनी रांगोळ्या, भित्तीचित्रे काढणे, जुन्या टायरमध्ये सजवलेल्या रंगीत कुंड्या ठेवणे, शोभेची झाडे आणि छोटेखानी हिरवळ निर्माण करणे इ. सुशोभीकरण केले जाणार आहे, जेणेकरून याठिकाणी कचरा टाकण्यापासून नागरिकांना परावृत्त करता येईल. येत्या काळात कल्याण डोंबिवलीत असणारी सर्वच कचऱ्याची ठिकाणे (Garabage Vulnerable Points) अशा प्रकारे बंद करून त्यांचे सुशोभीकरण करून संपूर्णपणे कचरामुक्त केली जाणार आहेत. त्यासाठी नागरिकांनी घरातील कचरा वर्गीकरण करून केवळ घंटागाडीमध्येच देण्यासह अशाप्रकारची गलिच्छ ठिकाणे आपल्या परिसरात निर्माण न होण्याची दक्षता घेण्याचे आवाहनही कल्याण डोंबिवली महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त रामदास कोकरे यांनी केले आहे.

नागरिकांनी सार्वजनिक वा खाजगी जागी, रस्त्यावर कचरा न फेकता केवळ महापालिकेच्या घंटागाडीमध्येच देण्याचे आवाहन घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त रामदास कोकरे यांनी केले आहे.

शहरातील काही ठिकाणांवर पडणाऱ्या उघड्या कचऱ्यामुळे, त्याभागातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्यासह शहराचा चेहरा मोहराही आणखीनच विद्रूप होऊ लागला होता. त्यावर आता घनकचरा व्यवस्थापन विभागाने

दरम्यान यापूर्वी मे 2020 मध्ये कल्याण डोंबिवली शहरात तब्बल 3 हजार 700 च्या आसपास कचराकुंड्या अस्तित्वात होत्या. त्या काढण्यात आल्यानंतर घंटागाडीमध्येच कचरा देण्याची पद्धत सुरू करण्यात आली होती. या बदलामुळे परिसरात केवळ स्वच्छताच झाली नाही तर एक नवा हरित कोपरा उभा राहणार असल्यामुळे, शहराच्या सौंदर्यीकरणातही भर पडण्यास मदत होणार आहे.

## रखडलेल्या पेन्शन योजनेचा लाभ दिव्यांगांना लवकरच मिळणार

आमदार संजय केळकर यांची संजय गांधी निराधार योजनेच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक

ठाणे : कागदपत्रांमधील त्रुटी आणि लाल फितीत अडकलेली दिव्यांग अर्जदारांची संजय गांधी निराधार योजनेची सर्व प्रकरणे डिसेंबरअखेर मार्गी लावण्यात येणार असून दरमहा २५०० रुपये निवृत्ती वेतन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आमदार संजय केळकर यांनी घेतलेल्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

जनसेवकाचा जनसंवाद या कार्यक्रमात आमदार संजय केळकर यांना विविध समस्यांची निवेदने प्राप्त झाली. सुमारे ५५ दिव्यांग बांधवांनी श्री.केळकर यांची भेट घेऊन संजय गांधी निराधार योजनेंतर्गत पेन्शन योजनेचा लाभ मिळण्यात अडचणी येत असल्याची तक्रार केली होती. काल केळकर यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आमंत्रित केले होते. दिव्यांग बांधवांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये त्रुटी काढण्यात आल्या आहेत तसेच लाल फितीच्या कारभारात त्यांची प्रकरणे रखडलेली असून राज्य शासनाच्या या महत्वाकांक्षी योजनेचा लाभ मिळत नसल्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. ही सर्व प्रकरणे आवश्यक दुरुस्त्या करून ३० नोव्हेंबरपर्यंत मंजूर करण्यात येतील आणि डिसेंबरमध्ये या योजनेचा लाभ दिव्यांग बांधवांना मिळेल, असा निर्णय अधिकाऱ्यांनी घेतला. त्यामुळे शेकडो दिव्यांग बांधवांना निवृत्ती वेतन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

याबाबत बोलताना आमदार संजय केळकर म्हणाले, राज्य शासनाच्या अनेक योजना पुढे येतात, पण अंमलबजावणी करण्यासाठी पाठपुरावा करावा लागतो, तेव्हा त्याचा लाभ नागरिकांना मिळतो. दिव्यांगांची रखडलेली प्रकरणे मंजूर करण्यासाठी विशेष बैठक बोलावून हा प्रश्न मार्गी लावला आहे. आज .केळकर यांची भेट घेत गाऱ्हाणे मांडले. मुंबई महापालिका आयुक्तांची लवकरच भेट घेऊन पात्र कर्मचाऱ्यांचा वारसा हक्काचा प्रश्न मार्गी लावणार असल्याचे




"आज झालेल्या कार्यक्रमात बीएसयुपी योजनेतील इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांनी उपस्थित राहून आमदार संजय केळकर यांचा सत्कार केला. केळकर यांनी २०१८ पासून केलेल्या पाठपुराव्यामुळे या रहिवाशांना अवघ्या १०० रुपयांच्या स्टँप पेपरवर नोंदणी करून घरे नावे करून घेता येणार आहेत. याचा फायदा हजारो कुटुंबांना होणार आहे. याबाबत उपस्थित रहिवाशांनी केळकर यांचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली.

या दिव्यांग बांधवांना महिना २५०० रुपये पेन्शन मिळणार असून त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटणार आहे.

नालासोपारा येथील इमारत १० वर्षांपूर्वी पाडण्यात आली. आजतागायत तेथील रहिवाशांना घरे मिळाली नाहीत. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी बोलून मार्ग काढणार असल्याचे संजय केळकर यांनी सांगितले. वारसा हक्काबाबत मुंबई महापालिकेच्या विविध भागात सफाईचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी देखील केळकर म्हणाले.

काल झालेल्या जनसेवकाचा जनसंवाद या कार्यक्रमात सायबर फसवणूक, एसआरए योजनेतील फसवणूक, वारसा हक्क आदींबाबत निवेदने प्राप्त झाली. त्यावर तत्काळ कार्यवाही सुरू करण्यात आली. यावेळी आमदार निरंजन डावखरे, माजी उपमहापौर अशोक भोईर, परिवहन सदस्य विकास पाटील, दिव्यांग सेल चे आनंद बनकर, राजेश गाडे, ओमकार चव्हाण आदी उपस्थित होते.

आत्मनिर्भरतेसाठी आयडीयाथॉन; सहभागासाठी विद्यार्थ्यांना आवाहन

## आयडीयाथॉन साठी नोंदणी सुरु; विजेत्याला पाच लाखांचे बक्षीस

पनवेल : आशियातील पहिली सूचीबद्ध डिपॉझिटरी आणि १६. ७ कोटींहून अधिक डी-मॅट खात्यांची विश्वासार्ह संरक्षक असलेली सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेडने ("सीडीएसएल") विद्यार्थ्यांसाठी एक नवीन आव्हानात्मक उपक्रम सुरू केला आहे. विद्यार्थ्यांसाठी त्यांनी पहिले आयडीयाथॉन लॉंच केले आहे. सीडीएसएलच्या वार्षिक रीइमॅजिन चर्चासत्राच्या तिसऱ्या आवृत्तीअंतर्गत पुनर्कल्पना आयडीयाथॉन हा उपक्रम राबवण्यात येत आहे.

भारतातील शिकण्याच्या, गुंतवणूक करण्याच्या आणि वाढीच्या पद्धतीत बदल घडवून आणतील अशा उपाययोजना डिझाइन करण्यात तरुण नवोन्मेषी मनांना गुंतवून ठेवणे हे आयडीयाथॉनचे उद्दिष्ट आहे. जेणेकरून बाजारातील सहभाग अधिक जबाबदार आणि समावेशक होईल. अधिकाधिक लोकांना आर्थिक क्षेत्रात आणण्यासाठी, त्यांचे दृष्टिकोन समजून घेण्यासाठी तसेच त्यांनी योगदान द्यावे यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी सीडीएसएल तरुण नवोन्मेषकांना प्रोत्साहन देत आहे. सेबी आणि आरबीआय सारख्या नियामकांच्या समान उपक्रमांवर त्यांचे उपक्रम आधारित आहेत. पुनर्कल्पना आयडीयाथॉन हा एक जबाबदार नवनिर्मितीचा उत्सव आहे. सतत विकसित होत असलेल्या मार्केट लँडस्केपमध्ये, तंत्रज्ञान हे एक उत्प्रेरक आणि विश्वासाचे फ्लायव्हील म्हणून काम करते जे गुंतवणूकदारांना योग्य साधने आणि अंतर्दृष्टी देऊन सक्षम करते. सिक्युरिटीज मार्केट अंतर्ज्ञानी, सर्वसमावेशक आणि प्रत्येक गुंतवणूकदारासाठी प्रवेशयोग्य असणे आवश्यक आहे. हे आयडीयाथॉन राष्ट्र उभारणीचे तसेच आत्मनिर्भर गुंतवणूकदाराचा दृष्टिकोन भक्कम करण्याची सीडीएसएलची वचनबद्धता प्रतिबिंबित करते. सगळ्या गोष्टींची माहिती असलेला गुंतवणूकदार हा सुरक्षित गुंतवणूकदार आहे, जो त्यांच्या आकांक्षा पूर्ण करणारे निर्णय घेण्यास सक्षम आहेआपले भविष्य घडवण्याच्या या उपक्रमात सहभागी होण्यासाठी आम्ही विद्यार्थ्यांना आमंत्रित करतो," असे नेहल व्होरा, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, सीडीएसएल म्हणाले.

आयडीयाथॉनमध्ये नावीन्य आणि सर्जनशीलतेसाठी एकूण ११. ५ लाखांचे बक्षीस दिले जाईल. विजेत्या कल्पनेसाठी ५ लाख, उपविजेत्यांना ३ लाख आणि २ लाख तर चौथ्या आणि पाचव्या स्थानासाठी प्रत्येकी ७५ हजार रुपये अशी बक्षिसे दिली जातील. आयडीयाथॉन २०२५ साठी १७ नोव्हेंबर २०२५ रोजी नोंदणी खुली होईल. एका संघात चार विद्यार्थी आणि त्यांचे मार्गदर्शक (एकाच संस्थेतील) सहभागी होऊ शकतात. प्रॉब्लेम स्टेटमेंट, मूल्यमापन आणि टाइमलाइनसंबंधातील अधिक तपशीलhttps://ideathon.cdslindia.com/येथे उपलब्ध आहेत.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१